नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक




## मुंबईतील तीन हजार मुलींना लाभ

मुंबई : (स. गांवकरी)

मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांच्या शिक्षणास चालना देणे, मुलींचा मृत्यू दर कमी करणे व बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यवर आणण्यासाठी, शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सरकारकडून 'लेक लाडकी योजना' राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत मुंबई शहरातील ६७१ आणि मुंबई उपनगरातील दोन हजार ८९२ अशा एकूण तीन हजार ५६३ मुलींना लाभ मिळणार आहे.

॥ दशक्रियाविधी ॥

आई आजही तुझ्या मायेची उब मला जाणवते,
घरातील प्रत्येक गोष्ट बघून तुझी खूप आठवण येते...!



कै.गं.भा. सिंधुबाई बाबुराव देसाई
यांना शनिवार दि. २२/८/२०२६ रोजी देवाज्ञा झाली.
यांना भावपुर्ण श्रध्दांजली..!

दशक्रियाविधी
सोमवार दि. ३१/८/२०२६ रोजी सकाळी ८ वा.
ठिकाण: श्रीक्षेत्र पुणतांबा, चांगदेव महाराज मंदिर जवळ, पुणतांबा येथे होणार आहे.

शोकाकुल
श्री. अरुण बाबुराव देसाई (मुलगा)
श्री. राजेंद्र बाबुराव देसाई (मुलगा)
सौ. मंगल राजेंद्र निकम (मुलगी)
समस्त देसाई परिवार, वडाळा महादेव
प्रवचन सेवा : प्रा.ॲड. आदिनाथ जोशी सर

# फडणवीसांना टार्गेट केलं जातंय

## एकनाथ शिंदे मूग गिळून गप्प, मनोज जरांगे त्यांचाच प्यादा, सदावर्तेंचा थेट हल्लाबोल



मुंबई : (स. गांवकरी)

मनोज जरांगे पाटील याला अंतरवाली सराटीत आणि मुंबईत आंदोलन करून देऊ नका असे मत ॲड गुणरत्न सदावर्ते यांनी व्यक्त केले. न्यायमूर्ती उच्च न्यायालय न्यायाधीश घुगे यांच्या निर्देशाचे पालन करा असं मी पोलिसांना सांगितल्याचे सदावर्ते म्हणाले. या सगळ्या प्रकरणात राजकीय व्यक्ती देखील सक्रिय आहेत. माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यासहित मराठा समाजातील इतर नेते यामध्ये सक्रिय आहेत. या आंदोलनाला सत्तेतील आणि सत्यबाहेरील थेट मराठा समाजाचा पाठिंबा असल्याचे सदावर्ते म्हणाले. त्यामुळं जातीय आकसापोटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट केलं जातं आहे. मनोज जरांगे हा एक प्यादा आहे, तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सेवक असल्याचे सदावर्ते म्हणाले. मुख्यमंत्र्याचं घर टार्गेट करतो असं म्हटलं तरी एकनाथ शिंदे मूग गिळून बसल्याचे सदावर्ते म्हणाले. फक्त एकनाथ शिंदे नाहीतर सत्तेतील इतर मंत्री विखे पाटील देखील मूळ मूळ बोलतात. विखे पाटलांनी कधीच मनोज जरांगे पाटील यांचा निषेध केला नाही असेही सदावर्ते म्हणाले.

मराठा भावांना मराठा आरक्षण नको तर ई डब्ल्यू एस आरक्षण हवे असे मला अनेक कॉल्स येत आहेत. पाटील नावाची पदे संविधानामध्ये मला दिसत नाहीत. गावामध्ये पाटील असतो तो बौद्ध किंवा आदिवासी समाजाचा असू शकतो. मनोज जरांगे म्हणतो की मला पाटील म्हणा. मनोज जारंगे पाटील गाड्यामधून येतो त्यामुळे हे आंदोलन टार्गेटेड आहे असे सदावर्ते म्हणाले. मनोज जरांगे आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला डिस्टर्ब करण्याची भाषा करत आहे.

रेल्वेची पटरी उघडून टाकू, विमानतळ उकडून टाकू असे बरळत आहे. महत्त्वाच्या व्यक्तींच्या घरांना टार्गेट करु हे अतिरेकी भाषा असल्याची टीका सदावर्ते यांनी केली. हा कोणाचातरी राजकीय प्यादा आहे. हे सगळं करणं असंविधानिक आहे. संविधानानुसार आंदोलन करण्याची मुभा आहे पण काही रिस्टिक्शन आहेत असेही ते म्हणाले. गंगाधर काळकुटे यांनी आझाद मैदान पोलिसांना अर्ज दिलेला आहे. ते म्हणजे मुंबईला धमकी पत्र आहे. या पत्राला गांभीर्याने घेतलं पाहिजे असं पोलिसांना मी सांगितल्याचे सदावर्ते म्हणाले. आंदोलन विशिष्ट राजकीय कारणासाठी होत आहे. कारण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे बिगर मराठा समाजामधील आहेत असेही ते म्हणाले.

आझाद मैदानाच्या परिसरात अडीचशे लोकांपेक्षा जास्त लोक आले तरी डिस्टर्ब होतो. पण मराठा आंदोलनाला चाळीस हजार आंदोलकी येतील. त्यामुळं पोलिसांनी आम्हाला सांगितले की कायदेशीर गोष्टी करणार आहोत. गंगाधर काळकुटे यांनी पोलिसांना दिलेला अर्ज निकाली काढावा असेही सदावर्ते म्हणाले.

### शिरसाट-बावनकुळेंना सोडणार नाही!

एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाट यांना पुढे करून, तर देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यामार्फत मराठा समाजाचे वाटोळे केले आहे. आम्ही यापैकी कोणालाही सोडणार नाही. जर आम्हाला प्रमाणपत्रे दिली तर आमचे प्रेम पूर्वीसारखेच राहील; अन्यथा कोणाचीही गय केली जाणार नाही. ज्यांचे असे म्हणणे आहे की ही प्रमाणपत्रे कायद्याच्या कसोटीवर रद्द झाली, त्यांनी अंतरवलीला येऊन ते सिद्ध करून दाखवावे, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मनोज जरांगे म्हणाले की, एकाच कुटुंबात बहिणीला जात पडताळणी प्रमाणपत्र (व्हॅलिडिटी) मिळते, मग भावाचे प्रमाणपत्र रद्द कसे होऊ शकते? जात पडताळणी अधिकारी व्हॅलिडिटीबाबत अधिकृत पत्र देणार असताना, संजय शिरसाट आणि चंद्रशेखर बावनकुळे ते रद्द करायला सांगत आहेत. मी हवेत किंवा फुकट आरोप करत नाही. मी छगन भुजबळ किंवा धनंजय मुंडे यांचे नाव घेतले आहे का? नाही, कारण त्यांचा याच्याशी काही संबंध नाही ज्यांचा संबंध नाही त्यांचे नाव घेण्याचे काम आम्ही करत नाही तसे आमच्यावर तसे संस्कार नाहीत. मनोज जरांगे म्हणाले की, सरकारला आंदोलकांवर हल्ले घडवून आणण्याशिवाय दुसरे काही येत नाही. पूर्वी आम्ही बेसावध होतो; आमच्या आंदोलनाच्या मंडपात पोलिसांना घुसण्याचा कोणताही अधिकार नव्हता.

# शेखर गोरे शिवसेनेच्या वाटेवर

## एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत १ सप्टेंबरला प्रवेश

### जिल्हा बँकेच्या सहकार पटावर नवा डाव; सत्तासमीकरणे बदलणार

सातारा : (स. गांवकरी)



सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे बंधू शेखर गोरे यांनी १ सप्टेंबर रोजी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडणार असून, यामुळे भाजपसह माण-खटाव तालुक्यातील राजकारण बदलण्याची चिन्हे आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत जयकुमार गोरे यांच्या विजयात शेखर यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने ते गेल्या काही दिवसांपासून भाजपवर नाराज होते. या नाराजीतूनच त्यांनी अखेर 'धनुष्यबाण' हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

एकेकाळी भावाला विधानसभेत पोहोचवण्यासाठी जीवाची बाजी लावणारे शेखर आता विरोधी छावणीत दाखल होत असल्याने जयकुमार गोरेंसाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. शेखर गोरेंच्या या निर्णयामुळे माण आणि खटाव तालुक्यात शिवसेनेची (शिंदे गट) संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर झालेल्या या बंडखोरीमुळे सातारा जिल्ह्यातील प्रस्थापित राजकारणाची गणिते पार बदलून गेली आहेत. कालपर्यंत खांद्याला खांदा लावून लढणारे दोन भाऊ आता आमनेसामने ठाकणार असल्याने माण-खटावच्या राजकारणात नेमकी कोणती नवी समीकरणे आकाराला येतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या पक्षप्रवेशामुळे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीतील राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. सहकार क्षेत्रावर वर्चस्व मिळवण्यासाठी विविध गटांकडून मोर्चेबांधणी सुरू असताना, माण-खटाव पट्ट्यात दांडगा प्रभाव असणारे शेखर गोरे यांची ही खेळी अत्यंत निर्णायक ठरणार आहे. विधान परिषदेत राजकीय संधी न मिळाल्याच्या नाराजीतून सुरू झालेल्या या घडामोडींमुळे त्यांच्या पुढील भूमिकेबाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असला, तरी खरा केंद्रबिंदू जिल्हा बँकेची निवडणूकच ठरणार आहे. सहकारातील पारंपरिक समीकरणांना धक्का देणारा हा प्रवेश जयकुमार गोरे यांच्या राजकीय गोटासाठी मोठे आव्हान मानले जात आहे. जिल्हा बँकेची निवडणूक ही केवळ संचालक निवडण्याची प्रक्रिया नसून सहकारातील सत्ता ठरवणारी लढाई असल्याने, १ सप्टेंबरच्या या प्रवेशानंतर जिल्ह्यात कोणत्या नव्या आघाड्या आकाराला येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# थोडक्यात पण महत्वाचे



## गुरुकुलच्या चिमुकल्यांनी बनवल्या हस्तनिर्मित राख्या

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल,बेल्हे या सीबीएसई मान्यताप्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेत रक्षाबंधनाचा सण अनोख्या व पर्यावरणपूरक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला.भारतीय संस्कृतीमध्ये रक्षण आणि संरक्षणाला विशेष महत्त्व असून,निसर्ग हाच मानवाचा खरा रक्षणकर्ता व पाठीराखा आहे,हा संदेश देत विद्यार्थ्यांनी संकुलातील विविध वृक्षांना राखी बांधून पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली. गुरुकुलमधील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यां नी एकत्र येत पर्यावरणपूरक राखी निर्मिती कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने आकर्षक व सुबक हस्तनिर्मित राख्या तयार केल्या. रंगीबेरंगी कागद,फुले तसेच विविध आकारांच्या कलात्मक साहित्याचा कल्पक वापर विद्यार्थ्यांनी केला.विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या या राख्यांमधून कला कौशल्याचा सुंदर आविष्कार दिसून आला.राखी निर्मिती बरोबरच विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.वृक्ष आपल्याला सावली,फळे, फुले आणि प्राणवायू देऊन जीवसृष्टीच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे वृक्षांचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारीअसल्या चा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तनिर्मित राख्या रक्षाबंधनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना बांधण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी कलाशिक्षिका दीप्ती चव्हाण तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात

तामसा (स. गांवकरी) : साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त एकराळा येथे विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित समाजकार्यकर्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य व विचारांवर प्रकाश टाकत समाजप्रबोधन केले. यावेळी तामसा (नाव्हा) येथील डॉ. संदीप कारंजकर, संजय खांनजोडे, प्रशांत महाजन यांच्यासह विविध समाजकार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांना सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. जयंती मंडळाच्या वतीने एकराळा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी तीन प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक वर्गातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वही व पेनचे वाटप करण्यात आले. याशिवाय, जयंतीचे औचित्य साधून गावामध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सामाजिक प्रबोधनासोबतच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. अशा विविध सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रमांनी एकराळा येथे डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

## मुक्ताई तर्फे आळंदी मंदिरात माउलींना रक्षाबंधन दिनी परंपरेने राखी अर्पण



आळंदी (स. गांवकरी) : श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात मुक्ताबाई संस्थान मुक्ताई नगर यांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांना मुक्ताई कडून बंधू श्री ज्ञानदा ला राखी अर्पण करण्यात आली. या वेळी मुक्ताई संस्थान अध्यक्ष रवींद्र भैया पाटील, ह भ प रवींद्र महाराज हारणे, संदीप पाटील तसेच ज्ञानेश्वर महाराज संस्थान विश्वस्त रोहिणी पवार, सागर महाराज लाहुडकर, संदिप भुसे, पांडुरंग पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## ठाण्यात 'सुगी लेक डिस्ट्रिक्ट'चा भव्य व्यावसायिक प्रकल्प उभारणार




ठाणे (स. गांवकरी) : सुगी ग्रुपने ठाणे पश्चिममध्ये ५२ एकर परिसरात आपला महत्त्वाकांक्षी जलकिनारी व्यावसायिक प्रकल्प 'सुगी लेक डिस्ट्रिक्ट' सादर केला आहे. खोपट येथील कॅडबरी जंक्शनजवळ, कोरम मॉलसमोर आणि ईस्टर्न एक्सप्रेस हायवेला लागून असलेला हा प्रकल्प सुगी ग्रुपच्या ठाणे बाजारपेठेतील पदार्पणाचे प्रतीक आहे. या प्रकल्पात लेक आणि सिटीच्या विहंगम दृश्यांसह ग्रेड ए++ दर्जाची व्यावसायिक कार्यालये, रिटेल दुकाने, उत्कृष्ट भोजन व्यवस्था आणि सहा एकरांचा लेकव्ह्यू प्रोमेनेड विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची रचना पद्मभूषण पुरस्कार विजेते आर्किटेक्ट हफीज कॉन्ट्रॅक्टर यांनी केली असून, संरचनात्मक सल्लागार म्हणून स्टर्लिंग तसेच समसमीक्षेसाठी स्किडमोर, ओविंग्ज अँड मेरिल यांचे सहकार्य लाभले आहे. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाला प्राधान्य देत या प्रकल्पाची नोंदणी लीड (LEED) अंतर्गत करण्यात आली आहे. त्यामुळे ठाण्यात आधुनिक, स्मार्ट आणि पर्यावरणदृष्ट्या जबाबदार व्यावसायिक केंद्र उभे राहणार आहे. या विकासातील पहिले प्रमुख आकर्षण तळमजला अधिक ४५ मजली व्यावसायिक टॉवर असेल. यामध्ये अंदाजे ८०० ते ६,००० चौरस फुटांपर्यंतच्या कार्यालयीन जागा उपलब्ध असतील. ४६ हाय-स्पीड लिफ्ट्स, मोठ्या फ्लोअर प्लेट्स आणि लेक व सिटी व्ह्यू असलेल्या प्रीमियम कार्यालयांमुळे प्रस्थापित कंपन्या, वाढते उद्योग, व्यावसायिक आणि गुंतवणूकदारांसाठी हा प्रकल्प आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. रूफटॉप लाउंज, कॅफे, फिटनेस सेंटर, पिकलबॉल कोर्ट, टर्फ आणि विविध वेलनेस सुविधांचाही यात समावेश असेल. सुगी ग्रुपचे संस्थापक व व्यवस्थापकीय भागीदार निशांत देशमुख यांनी सांगितले की, 'सुगी लेक डिस्ट्रिक्ट' हा व्यवसाय, जीवनशैली आणि आरोग्य यांचा संगम साधणारा आधुनिक प्रकल्प ठरेल. कॅडबरी जंक्शन आणि महामार्गालगत असलेल्या या प्रकल्पाला विस्तारणारे मेट्रो नेटवर्क, प्रस्तावित ठाणे कोस्टल रोड, विविध द्रुतगती मार्ग आणि इतर महत्त्वाच्या वाहतूक प्रकल्पांची जोड मिळणार आहे.

# द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडकडून मल्टी कॅप फंड लाँच

**बाजारपेठेतील सर्व चक्रांमधील संधींचा फायदा घेण्यावर भर : एनएफओ २७ ऑगस्ट २०२६ रोजी खुला होणार आणि १० सप्टेंबर २०२६ रोजी बंद होणार**

मुंबई : (स. गांवकरी)

द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंड या पॅन्टोमॅथ ग्रुपचा भाग असलेल्या कंपनीने आज द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंड लाँच करण्याची घोषणा केली. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना आहे, जी दीर्घकालीन भांडवली वाढ मिळवण्याच्या उद्दिष्टाने लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करते. हा न्यू फंड ऑफर २७ ऑगस्ट २०२६ रोजी खुला होईल आणि १० सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल. त्यानंतर २१ सप्टेंबर २०२६ पासून ही योजना सातत्यपूर्ण व्यवहारांसाठी पुन्हा खुली केली जाईल. हा फंड एका सोप्या तत्त्वावर आधारित आहे: प्रत्येक मार्केट-कॅप विभागाचे पोर्टफोलिओमध्ये विशिष्ट स्थान असते, कारण आर्थिक आणि बाजारपेठेच्या चक्रानुसार प्रत्येक विभाग वेगवेगळा सहभाग नोंदवतो. मल्टी कॅप फंडाला लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप इक्विटीमध्ये प्रत्येकी किमान २५ टक्के गुंतवणूक राखणे बंधनकारक असते. द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंडचा या तिन्ही मार्केट-कॅप विभागांमध्ये प्रत्येकी २५ टक्के ते ५० टक्क्यांच्या दरम्यान अंदाजित अलॉकेशन रेंज असेल, ज्यामुळे गुंतवणूक टीमला नियामक चौकटीत राहून बाजारपेठेतील उत्तम संधी शोधण्याची स्थिरता मिळते.

The Wealth Company MUTUAL FUND

द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडच्या संस्थापक, मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ कुमारी मधू लुनावत म्हणाल्या, "मार्केट कॅपिटलायझेशन हा आकडा आहे, गुंतवणुकीचा सिद्धांत नाही. एखादी कंपनी आज मोठी असू शकते आणि कंपनीकडे वाढीसाठी मर्यादित वाव असू शकतो. तर दुसरीकडे, एखादी छोटी कंपनी उद्याची मार्केट लीडर बनण्याची क्षमता ठेवू शकते. खरी मेहनत अशा व्यवसायांचा शोध घेण्यात आहे, ज्यांच्याकडे काळाच्या ओघात मूल्य निर्माण करण्याचे व्यवस्थापन, स्पर्धात्मक ताकद आणि विकास क्षमता आहे. आम्ही मल्टी कॅपकडे केवळ भरण्यासाठी असलेल्या तीन बॉक्सेसच्या दृष्टीने पाहत नाही, तर संशोधन, आव्हान आणि विश्वास निर्माण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या एका मोठ्या संधीच्या रूपात पाहतो." ही योजना मूलभूत संशोधन आणि व्यापक दृष्टिकोनावर आधारित सक्रिय गुंतवणूक धोरणाचे पालन करेल. यामध्ये तळागाळातील समभागांची निवड आणि वरच्या पातळीवरील संरचनात्मक ट्रेंडचे यांचा मेळ घातला जाईल. या गुंतवणूक प्रक्रियेत गुंतवणुकीयोग्य विश्वाची उभारणी करण्यासाठी वैज्ञानिक आणि विश्लेषण कौशल्यांवर आधारित इन-हाउस स्क्रिनिंग फ्रेमवर्कचा वापर केला जाईल, ज्याला पोर्टफोलिओ रचना आणि योग्य मूल्यांकनासाठी प्रायव्हेट-इक्विटी-स्टाईल दृष्टिकोनाची जोड दिली जाईल. हा फंड दीर्घकालीन वाढीचा दृष्टिकोन ठेवून विविध कंपन्या आणि क्षेत्रांमध्ये वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ तयार करण्याचा प्रयत्न करेल. याद्वारे तिन्ही मार्केट-कॅप विभागांमधील सहभाग कायम ठेवत आर्थिक चक्राच्या वेगवेगळ्या टप्प्यांमधील संधींचा फायदा पोर्टफोलिओला घेता येईल. या योजनेचे व्यवस्थापन चिन्मय साठे करणार आहेत. हा फंड आपल्या कामगिरीची तुलना निफ्टी ५०० मल्टी कॅप ५०:२५:२५ टीआरआयशी करेल, जो लार्ज, मिड आणि स्मॉल-कॅप विभागांची कामगिरी दर्शवतो आणि या योजनेच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट व अॅसेट-अलॉकेशन फ्रेमवर्कशी सुसंगत आहे.

# रक्षा करणाऱ्यांचेच रक्षण व्हावे!

कनाशी : (स. गांवकरी)



- अभोना पोलीस ठाण्यात शितल महाजन यांचे पोलीस बांधवांना राखीबंधन
- काँग्रेस महिला तालुकाध्यक्ष शितल महाजन यांचा अनोखा उपक्रम; एपीआय विजय चौरे यांच्यासह पोलीस बांधव भारावले

नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाच्या पावन मुहूर्तावर अभोना पोलीस ठाण्यात एक हृदयस्पर्शी सोहळा पार पडला. सणासुदीला स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहून अहोरात्र जनतेच्या रक्षणासाठी तत्पर असणाऱ्या खाकी वर्दीला मायेची ऊब देण्यासाठी काँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष शितल महाजन यांनी थेट पोलीस ठाण्यात जात पोलीस बांधवांना राखी बांधली. यावेळी महाजन यांनी, पोलीस बांधव हे आमचे खरे रक्षक आहेत. दिवाळी, होळी, रक्षाबंधन असे सण ते आमच्यासाठी त्याग करतात. त्यांच्यावर कोणतंही संकट येऊ नये आणि त्यांचं रक्षण व्हावं, या भावनेने मी आज ही राखी बांधली आहे, अशी भावना व्यक्त केली. या अनोख्या उपक्रमाने पोलीस ठाण्यातील वातावरणच बदलून गेले. अभोना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चौरे यांनी शितल महाजन यांनी बांधलेल्या राखीचा स्वीकार करत, रक्षाबंधनाच्या या पवित्र नात्याला आम्ही सदैव जपू, असा विश्वास दिला. तसेच त्यांनी कळवण तालुक्यातील सर्व नागरिकांना रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. महाजन यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, खाकी वर्दीला मिळालेली ही बहिणीच्या मायेची राखी सध्या अभोन्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

# संगमेश्वर जेष्ठ नागरिक संघाच्या नूतन कार्यालय उद्घाटन थाटात संपन्न

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

संगमेश्वर जेष्ठ नागरिक संघ नेतवड ता:-जुन्नर यांच्या नूतन कार्यालयाचा व नवीन संघाचे भव्य उद्घाटन समारंभ गुरुवार दिनांक २७ ऑगस्ट रोजी माननीय आमदार शरद दादा सोनवणे शिवजन्मभूमी जुन्नर यांच्या हस्ते संपन्न झालाप्रमुख पाहुणे युवासेना तालुकाप्रमुख विकास राऊत यांच्या उपस्थि- तीत संपन्न झाला प्रसंगी माजी आमदार बाळासाहेब दांगट यांची उपस्थिती प्रसंगी लाभली. जुन्नर तालुका जेष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष प्राध्यापक एकनाथ डोंगरे, उपाध्यक्ष अरुण गायकवाड, संघाचे कर्तव्यदक्ष सचिव नामदेव दिघे समन्वयसमितीचे आधारवड व ज्येष्ठ मार्गदर्शक माननीय भिवा माळवे गुरुजी ओतुरकर तालुका संघाचे खजिनदार विठ्ठल वायकर व ह.भ.प. धोंडीभाऊ पानसरे महाराज यांचे बहुमोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच दूरध्वनी वरून आमदार शरद दादा सोनवणे यांनी नूतन इमारत बांधकामाचे आश्वासन दिले वा तालुका संघाचे प्रवक्ते शंकरराव भिसे गुरुजी यांनी साने गुरुजींच्या प्रार्थनेचे कट आउट ट संगमेश्वर संघाला सप्रेम भेट दिली व दूरध्वनीवर संघाच्या कार्यास शुभेच्छा दिल्या प्रस्ताविकात सचिव दिघे यांनी संघाचे महत्त्वविशद केले अध्यक्ष प्राध्यापक डोंगरे यांनी संघ शक्तीमुळे संघाला आनंद देता येतो व आनंद घेता येतो व ज्येष्ठांना योगाचे महत्त्व पटवून दिले. ज्येष्ठांनी वृद्ध काळात स्वतःची काळजी कशी घ्यावी यावर उपाय सांगितले विविध योजनांची माहिती विठ्ठल वायकर यांनी उपस्थितांना दिली व नूतन कार्यकारी समिती निवड करण्यात आली खालील प्रमाणे अध्यक्ष दत्तात्रय भिकाजी गायकवाड उपाध्यक्ष: सुरेश गायकवाड सचिव:- अशोक गायकवाड सहसचिव शांताराम गायक वाड कार्याध्यक्ष श्रीधर कुटे, खजिनदार तानाजी कुटे, सह खजिनदार:- बाबाजी मोढवे , महिला सदस्य श्रीमती शैला कुटे महिला सदस्य नंदाबाई वाघमारे संघाचे पदाधिकारी सर्वानुमते निवड करण्यात आली.

# माचनूरची माती सांगतेय इतिहास

## औरंगजेबाची छावणी आणि संताजी घोरपडेंच्या पराक्रमाची साक्ष

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात भीमा नदीच्या काठावर वसलेले माचनूर हे आज एक शांत गाव म्हणून ओळखले जाते. मात्र, या परिसराच्या मातीत मराठा-मुघल संघर्षाच्या काळातील अनेक ऐतिहासिक आठवणी दडलेल्या आहेत. सुमारे सतराव्या शतकाच्या अखेरीस दख्खन जिंकण्यासाठी औरंगजेब दक्षिणेत आला होता. सोलापूर परिसरात त्याचा प्रदीर्घ मुक्काम राहिला आणि माचनूर परिसरात मुघल सैन्याची महत्त्वाची छावणी उभारण्यात आली होती.

मराठ्यांच्या गनिमी काव्यामुळे मुघल सैन्याला मोठा त्रास सहन करावा लागत होता. सरसेनापती संताजी घोरपडे आणि सेनापती धनाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्य अचानक हल्ले करून मुघलांची रसद आणि सैनिकी व्यवस्था विस्कळीत करत असे. माचनूरचा किल्ला आणि त्याच्या आसपासचा परिसर हा या संघर्षाचा महत्त्वाचा साक्षीदार ठरला. भीमा नदीच्या दोन्ही तीरांचा वापर करत मराठे रात्रीच्या वेळी अचानक छावणीवर धडक देत आणि पुन्हा सुरक्षितपणे माघारी परतत असल्याचे स्थानिक ऐतिहासिक संदर्भांत नमूद केले जाते.



या काळात संताजी घोरपडे हे मुघलांसाठी अत्यंत आव्हानात्मक ठरलेले मराठा सेनापती होते. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत त्यांनी धनाजी जाधवांसह मुघलांविरुद्ध प्रभावी लढा दिला. त्यांच्या वेगवान हालचाली, अचानक हल्ले आणि गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीमुळे मुघल सैन्यावर मोठा दबाव निर्माण झाला होता. मराठी विश्वकोशातही संताजी घोरपडे यांच्यासह मराठा सरदारांनी मुघलांविरुद्ध केलेल्या संघर्षाचा उल्लेख आहे. संताजी घोरपडे यांच्या आयुष्याचा शेवट मात्र अत्यंत दुःखद झाला. इ.स. १६९६ मध्ये त्यांची हत्या झाली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे शिर बादशहाकडे नेण्यात आल्याचे विविध ऐतिहासिक संदर्भांत नमूद आहे. माचनूर परिसराशी जोडली जाणारी एक स्थानिक ऐतिहासिक परंपरा अशीही सांगते की, संताजींच्या मृत्यूनंतर त्यांचे शिर औरंगजेबाच्या छावणीच्या परिसरात आणण्यात आले होते. मात्र, हे नेमके माचनूर येथेच घडले, याबाबत उपलब्ध प्रमुख ऐतिहासिक स्रोतांमध्ये स्पष्ट आणि निर्विवाद नोंद आढळत नाही.

# भोकर शहरात 'ईद-ए-मिलाद'निमित्त डीजेमुक्त मिरवणूक उत्साहात संपन्न

## हजारो मुस्लिम बांधवांचा सहभाग; देशाच्या एकता-अखंडतेसाठी ईदगाह येथे प्रार्थना



भोकर : (स. गांवकरी)

ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने मिलाद कमिटीच्या वतीने भोकर शहरात सोमवारी (दि. 26 ऑगस्ट) ऐतिहासिक व भव्य डीजेमुक्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. धार्मिक उत्साह, शांतता आणि सामाजिक सौहार्दाचे दर्शन घडविणाऱ्या या मिरवणुकीत हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

शहरातील मस्जिद-ए-आयेशा येथून सकाळी 10 वाजता मिरवणुकीला सुरुवात झाली. नांदेड रोड, उड्डाणपुलावरून मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहोचली. याठिकाणी विविध राजकीय व सामाजिक संघटनांच्या वतीने मिलाद कमिटीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, क्रांतिवीर वस्ताद लहूजी चौक मार्गे ईदगाह येथे पोहोचली. तेथे नमाज-ए-जोहोर अदा करून देशाच्या एकता, अखंडता आणि शांततेसाठी प्रार्थना करण्यात आली.

मिरवणुकीदरम्यान 'या नबी सलाम अलैका'सह विविध धार्मिक घोषणांनी शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. अनेक ठिकाणी नात-शरीफ पठण करण्यात आले. तसेच लहान मुलांनी आकर्षक वेशभूषेत सहभाग घेतला. शहरातील विविध ठिकाणी भाविकांसाठी शीतपेयांचे वाटप करण्यात आले. लहान मुले आणि युवकांचा मिरवणुकीत विशेष उत्साह पाहायला मिळाला. मिरवणुकीत नगरसेवक शेख युसूफ, नगरसेवक शेख नाजिम, तोसीफ इनामदार, बाबाखान, जवाजोद्दीन बडबेकर, हमीदखान पठाण, बाबुभाई तामसेकर, मिर्झा ताहेर बेग, रफीक सेठ भोजानी, सय्यद रफीक, शेख साबीर, ताजोद्दीन भाई, कासीम साब, मुजीब भाई, मुजीब कुरेशी, मसूद भाई, अर्शद अहमद, निळकंठ वर्षेवार, मिलिंद गायकवाड आदी सहभागी झाले होते. मिरवणूक शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडावी यासाठी आतिफ शेख उर्फ अत्तू, मन्सूर पठाण कोळगावकर, सय्यद मोसीन अली, जवाद अली, शेख तुराब, शेख फैसल, इरफान हुसेन, शेख अल्फान आदींनी परिश्रम घेतले.

दरम्यान, मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# जालना नांदेड समृद्धी महामार्ग नांदेड तालुक्यातील बांधीत शेतकऱ्या बांधवांची बैठक

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

जालना नांदेड समृद्धी महामार्ग नांदेड तालुक्यातील बांधीत शेतकऱ्यांनी 30 ऑगस्ट रोजी बाभुळगाव फाटा ऊस्मनागर रोड येथे महत्वपूर्ण विषयांवर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. जालना नांदेड समृद्धी महामार्गातील नांदेड तालुक्यातील बाधित गावातील शेतकऱ्यांना विनंती करण्यात येते की सर्विस रोड व इंटरचेंज साठीभूसंपादनाची अधिसूचना निघालेली आहे त्या अधिसूचने वरतीघेतलेल्या आक्षेप वरती निर्णय देण्यात आलेला आहे त्यामुळे प्रशासन सक्तीने भूसंपादनासाठी आपल्या जमिनीच्या मोजणी करणार आहेत,परंतु आपला कुठलाही प्रश्न निकाली काढलेला नाही ,तसेच माननीय महसूल मंत्री बावनकुळे यांनी जमिनीच्या मूल्यांकन व इतर मागण्या बाबत जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडून अहवाल मागितलेला आहे, त्या अहवाला वरती अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही ,तसेच पूर्वीचे राहिलेले 12 टक्के व्याजाची रक्कम , सानुग्रह अनुदान देण्या बाबतचा प्रस्ताव ,फेर मूल्यांकना बाबत उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे , शेतकऱ्यांना इकडून तिकडे जाण्यासाठी बोगदे तथा अंडरपॉसेस सोडणे,आता संपादित होणाऱ्या जमिनी या हायवेलगत आल्यामुळे त्यांचा दर अपडेट करणे तथा सुधारणे हे सर्व शासन स्तरावर ती पेंडिंग असताना जिल्हा प्रशासन जमिनी कवडीमोल भावाने पूर्वीसारखेच संपादन करण्याच्या तयारीत आहे , जोपर्यंत शासन निर्णय होत नाही तोपर्यंत पुढील भूसंपादनाची प्रक्रिया थांबवावी याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्याबाबत व पुढील दिशा ठरविण्यासाठी अतिशय महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे ,तरी सर्व पूर्वीचे व नव्याने बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी रविवारी सकाळी 30 ऑगस्ट 2026 सकाळी ठीक 9.30 वाजता बाबुळगाव फाटा ,उस्मान नगर रोड तालुका नांदेड येथे जास्तीत जास्त शेतकरी बंधूंनी उपस्थित राहावे असे आवाहन दासराव हंबर्डे,अशोक मोरे, शिवाजीराव कदम,परदेशी बाबूजी, माजिद शेठ,दीपक पाटील,कांचनगिरे बंधू ,हरीश हंबर्डे ,संतोष मस्के, प्रफुल डोईफोडे, तुळशीराम झरीकर, परसराम झरीकर,ठाकूर साहेब पांगरी, माधव कदम, आनंदराव कुरे सर्व काकांडी शेतकरी,भालेराव बंधू तुप्पा व इतर शेतकरी कृती समिती नांदेड यांनी केले आहे.

# खेळासोबत आरोग्याचीही काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे

पुणे : (स. गांवकरी)

राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी 29 ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. भारतातील महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस, खेळ, शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करतो. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये व्यायाम आणि खेळासाठी वेळ देणे अत्यंत आवश्यक झाले आहे. नियमित शारीरिक हालचालींमुळे शरीराची ताकद आणि लवचिकता वाढण्यासोबतच हाडे, स्नायू आणि सांध्यांचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत होते. मात्र, खेळताना योग्य तंत्र, वॉर्म-अप, स्ट्रेचिंग आणि आवश्यक सुरक्षा उपायांकडे दुर्लक्ष केल्यास दुखापतींचा धोका वाढू शकतो.

याबाबत मार्गदर्शन करताना Medicover Hospitals, Pune येथील Dr. Rahul Gagare, Consultant Orthopaedic, Joint Replacement, Arthroscopy and Sports Medicine Surgeon सांगतात की, खेळाडू असो किंवा नियमित व्यायाम करणारी व्यक्ती, आपल्या शरीराची क्षमता आणि मर्यादा समजून घेणे महत्त्वाचे आहे. अचानक किंवा क्षमतेपेक्षा जास्त व्यायाम करण्याऐवजी योग्य प्रशिक्षण आणि हळूहळू वाढवलेली शारीरिक सक्रियता दुखापती टाळण्यास मदत करू शकते. खेळाशी संबंधित दुखापतींमध्ये गुडघा, घोटा, खांदा आणि स्नायूंच्या दुखापती सामान्यपणे आढळतात.

# राखी २०२६च्या खरेदीत मीशोवर ३६% वाढ; नॉन-मेट्रो भारताचा ७३% वाटा

पुणे : (स. गांवकरी)

यंदाच्या राखी सणानिमित्त ऑनलाइन खरेदीला मोठी चालना मिळाली असून, मीशोवरील राखीच्या ऑर्डर्समध्ये मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ३६ टक्के वाढ झाली आहे. गेल्या महिनाभरातील राखी शॉपिंग कालावधीत प्लॅटफॉर्मच्या ग्रॉस मर्चेंडाइज व्हॅल्यू (GMV) मध्येही सुमारे ३८ टक्के वाढ नोंदवण्यात आली. विशेष म्हणजे, या वाढीत देशातील मोठ्या महानगरांपेक्षा नॉन-मेट्रो शहरांचा मोठा वाटा राहिला. मीशोवरील राखीच्या एकूण ऑर्डर्सपैकी सुमारे ७३ टक्के ऑर्डर्स नॉन-मेट्रो बाजारपेठांमधून आल्या. टियर-३ आणि टियर-४ शहरांमध्ये सर्वाधिक वेगाने वाढ झाल्याने सणासुदीच्या ऑनलाइन खरेदीचा विस्तार आता लहान शहरांपर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे. उत्तर प्रदेशातील दादरी या लहान औद्योगिक शहराने राखीच्या ऑर्डर्समध्ये सुमारे १०५ टक्के वार्षिक वाढ नोंदवत आघाडी घेतली. त्यानंतर ओडिशातील नबरंगपूर, तसेच कासगंज, धमतरी आणि मध्य प्रदेशातील नैनपूर या शहरांमध्येही राखीच्या खरेदीत लक्षणीय वाढ झाली. राखीच्या ऑनलाइन खरेदीत ग्राहकांच्या पेमेंट पद्धतीतही सकारात्मक बदल दिसून आला. मीशोवरील तब्बल ५८ टक्के राखी ऑर्डर्स प्रीपेड पद्धतीने करण्यात आल्या. ऑनलाइन व्यवहारांबाबत ग्राहकांचा वाढता विश्वास आणि डिजिटल पेमेंटचा वाढता स्वीकार याचे हे संकेत मानले जात आहेत. राखीच्या वाढत्या मागणीचा फायदा लहान व्यावसायिक आणि उद्योजकांनाही झाला. मीशोवर राखीशी संबंधित उत्पादने विकणाऱ्या विक्रेत्यांच्या संख्येत वार्षिक ७२ टक्के वाढ झाली. नव्या विक्रेत्यांनी आपल्या उत्पादनांच्या कॅटलॉगमध्ये विविध पर्यायांचा समावेश करत देशभरातील सणासुदीच्या मागणीचा लाभ घेतला. डिझाइन आणि फॉरमॅटमध्ये अनेक नवे पर्याय बाजारात आले असले तरी पारंपरिक राख्यांची मागणी कायम राहिली. यंदा ग्रीटिंग कार्डसोबत मिळणारा ब्रेसलेट-स्टाइल राखी सेट सर्वाधिक विक्री झालेल्या उत्पादनांपैकी एक ठरला. याचबरोबर ग्राहकांचा पर्सनलाइज्ड गिफ्टिंगकडेही कल वाढला. विशेषतः नाव असलेल्या पर्सनलाइज्ड नेम राख्यांच्या मागणीत वेगाने वाढ झाली. त्यामुळे राखी हा केवळ पारंपरिक सण न राहता वैयक्तिक भावना आणि खास गिफ्टिंगशी जोडला जात असल्याचे दिसून येते. राखी २०२६च्या खरेदीचे आकडे भारतातील ई-कॉमर्सच्या बदलत्या स्वरूपाकडे लक्ष वेधतात. नॉन-मेट्रो शहरांमधील वाढती मागणी, प्रीपेड व्यवहारांचा वाढता वाटा आणि छोट्या विक्रेत्यांचा वाढता सहभाग यामुळे सणासुदीच्या ऑनलाइन बाजारपेठेचा विस्तार देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. एकीकडे ग्राहकांना विविध आणि पर्सनलाइज्ड पर्याय उपलब्ध होत आहेत, तर दुसरीकडे छोट्या शहरांतील विक्रेत्यांना देशव्यापी ग्राहकवर्ग मिळत आहे. त्यामुळे राखी २०२६चा सण ग्राहकांसोबतच छोट्या उद्योजकांसाठीही ई-कॉमर्सच्या वाढत्या संधींचा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

meesho

## थोडक्यात पण महत्वाचे




### श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये सैनिकांसमवेत रक्षाबंधन

सोलापूर (स. गांवकरी) : श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल सोलापूर येथे सैनिका समवेत रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. देशाच्या सीमेवर रक्षण करणारे वीर योद्धा यांच्यासमवेत काल दिनांक 27 ऑगस्ट 2026 रोजी श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल सोलापूर येथे रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती यश सिद्धी आजी- माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांची लाभली होती. असोसिएशन चे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष आयुष्यमान शिवपुत्र घटकांबळे सोलापूर शाखेचे सचिव आयुष्यमान कॅप्टन बाबुराव भेलभंडारे सोलापूरचे संघटक आयुष्यमान हवालदार सूर्यकांत गजगाटे 1971 चे युद्ध वीर लिंबाजी कांबळे 1987 ऑपरेशन पवन सहभागी वीर हवालदार सुरेश खळसोडे हे सर्व महार रेजिमेंटचे माजी सैनिकाच्या हातून प्रारंभी विद्येचे देवता सरस्वती व ग्रामदैवत सिद्धेश्वर यांच्या प्रतिमांचे पूजन करून रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. चिमुकल्यांचा हातून राखी बांधून हा पारंपारिक सण साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ नीता सोमवंशी या होत्या. कॅप्टन बेलभंडारे यांनी आपल्या सैनिकी जीवनातील प्रसंग व सैनिकांचे कार्य याविषयी सविस्तरपणे सांगितले सांगितले. तसेच राज्य उपाध्यक्ष शिवपुत्र घटकांबळे यांनी देशाच्या जडणघडणीत सैनिकाचे मोलाचे योगदान काय असतात हे विशद केले. सूत्रसंचालन सौ आरती तांदळे मॅडम यांनी केले.

### पोलिसांच्या सतर्कतेने वाचले महिलेचे प्राण

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील सांगणोरे येथील साबळेवाडी येथे एका महिलेने घरगुती कारणातून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती डायल ११२ वरून ओतूर पोलिसांना मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत महिलेचे प्राण वाचविले असल्याची माहिती ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. रेश्मा लक्ष्मण साबळे यांनी घरगुती कारणातून फाशी घेण्याचा प्रयत्न केल्याची माहिती डायल ११२ वर प्राप्त झाली. या कॉलची तातडीने दखल घेत ओतूर पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार जनार्दन सापटे व महिला पोलिस शिपाई संगीता दिघे यांनी विलंब न करता सांगणोरे येथील साबळेवाडी गाठली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तत्काळ रुग्णवाहिकेला पाचारण केले. त्यानंतर संबंधित महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी महिलेची प्रकृती सध्या ठीक असल्याचे सांगितले. डायल ११२ वरून आलेल्या कॉलची तातडीने दखल घेत सापटे व दिघे यांनी दाखविलेली तत्परता, प्रसंगावधान व धाडस यामुळे एका महिलेचे प्राण वाचण्यास मदत झाली. संकटाच्या प्रसंगी पोलिसांनी दाखविलेल्या मानवतावादी दृष्टिकोनाचे स्थानिक नागरिकांनी कौतुक केले असून, त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### पिंपळवंडीतील प्रकरणाचा 'एसआयटी' कडून तपास

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे अल्पवयीन मुलीचा निर्घुण खून करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याच्या धक्कादायक प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापनाकरण्यात आली आहे.पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी ही माहिती दिली. त्यामुळे या गंभीर प्रकरणाच्या तपासाला आता वेग येणार आहे.या प्रकरणी आळेफाटा पोलिसांनी गुन्हा दाखलकरून संशयित आरोपीला अटक केली आहे.

# बेपत्ता झालेले सहाही विद्यार्थी सुखरूप सापडले

## शेतात ऊस तोडून खाल्ल्याने शेतकऱ्याने तक्रारीचा दम दिल्याने घाबरले होते



इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील वैतरणानगर येथील शासकीय आश्रमशाळेतून काल बेपत्ता झालेले सहाही विद्यार्थी रात्री उशिरा सुखरूप सापडले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित घरवापसीमुळे शाळा प्रशासन, शिक्षक आणि पालकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आल्याने पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. गुरुवार दि. २७ रोजी दुपारच्या सुमारास हे सहा विद्यार्थी अचानक शाळेतून बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शाळा प्रशासन आणि पालकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. विद्यार्थ्यांचा शोध सुरू असताना ते वाटेतील एका शेतात गेले असल्याची माहिती समोर आली. तेथे त्यांनी ऊस तोडून खाल्ल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, संबंधित शेतकऱ्याने विद्यार्थ्यांना पकडून याबाबत शाळेत तक्रार करण्याचा इशारा दिल्याने विद्यार्थी घाबरले. या भीतीमुळे ते शाळेत किंवा घरी परतण्यास कचरले. त्यानंतर ते धारगाव परिसरातील एका ठिकाणी जाऊन बसले.

ज्या ठिकाणी विद्यार्थी जाऊन बसले होते, त्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे सांगण्यात येते. याच परिसराच्या काही अंतरावर वैतरणा धरणाचे पाट वाहतात. तसेच बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने परिसरात दोन पिंजरेही लावले आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांचा शोध घेत असताना एका CCTV कॅमेऱ्यात ते त्या दिशेने जाताना दिसून आले. त्यानंतर शिक्षक, मुख्याध्यापक, पालक आणि गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी रात्री त्या परिसरात धाव घेतली. रात्रीच्या अंधारात टॉर्चच्या उजेडात शोधमोहीम सुरू करण्यात आली. त्यावेळी एका व्यक्तीने विद्यार्थी त्या ठिकाणी बसल्याचे पाहिले असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी घाबरू नये यासाठी एक व्यक्ती त्यांच्याजवळ गेला. विद्यार्थ्यांना सुखरूप पाहिल्यानंतर त्यांना धीर देण्यात आला आणि सुरक्षितपणे तेथून बाहेर आणण्यात आले. त्यानंतर सर्व सहाही विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. विद्यार्थी सुखरूप असल्याचे पाहताच पालक आणि शिक्षकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. या पार्श्वभुमीवर एल्गार कष्टकरी संघटनेचे अध्यक्ष भगवान मधे यांनी या आश्रम शाळेत भेट देऊन विद्यार्थ्यांची विचारपुस करून यापुढे मुलांच्या सुरक्षेची अधिक काळजी घेण्यात यावी असे आवाहन मुख्याध्यापक यांना केले.

रात्री उशिरा विद्यार्थी सापडल्यानंतर शिक्षक आणि पालकांनी त्यांची विचारपूस केली. विद्यार्थ्यांची भीती दूर करण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. रक्षाबंधनाच्या दिवशी मुलांची सुरक्षित घरवापसी झाल्याने पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षक, प्रशासन आणि गावकऱ्यांचे पालकांनी आभार मानले. या घटनेनंतर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतही अधिक काळजी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे.




# संगमनेर मर्चंट बँकेचा हजार कोटींचा टप्पा पार

## ६१ व्या वार्षिक सभेत राजेश मालपाणी यांची माहिती; सायबर सुरक्षेवर विशेष भर

संगमनेर : (स. गांवकरी)

संगमनेर मर्चंट बँकेने हीरक महोत्सवी वर्षात संमिश्र व्यवसायाची १०३१ कोटी रुपयांची देदीप्यमान कामगिरी केली आहे. हजारो सभासद, ठेवीदार आणि संचालकांच्या एकजुटीमुळेच हा टप्पा पार करणे शक्य झाले असून पुढील काळातही बँक अग्रेसर राहील, अशी ग्वाही बँकेचे चेअरमन व प्रमुख मार्गदर्शक राजेश मालपाणी यांनी दिली. सर्वसाधारण सभा सभासदांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी व्यासपीठावर व्हाईस चेअरमन मधुसूदन नावंदर, विद्यमान चेअरमन सीए संजय राठी, व्हाईस चेअरमन रवींद्र पवार, संचालक प्रकाश राठी, संतोष करवा, प्रकाश कलंत्री, मुकेश कोठारी, संदीप जाजू, महेश डंग, सम्राट भंडारी, वैभव दिवेकर, जुगल बाहेती, शाम भडांगे, तज्ज्ञ संचालक गोपाळ पडताणी, सीए प्रवीण दिड्डी आणि ऑडिटर सीए जितेंद्र लाहोटी उपस्थित होते.

ओंकारनाथ मालपाणी यांनी ६१ वर्षांपूर्वी स्थापन केलेली ही बँक अनेकांच्या विकासाची गंगोत्री ठरली आहे. बदलत्या काळानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पारदर्शक कारभाराच्या बळावर बँकेची वाटचाल सुरू आहे. वाढत्या स्पर्धेतही बँकेची आर्थिक स्थिती भक्कम आहे. सायबर गुन्ह्यांचे वाढते धोके लक्षात घेऊन आयटी विभागाच्या माध्यमातून ग्राहकांच्या ठेवींच्या सुरक्षेवर विशेष लक्ष दिले जात असल्याचे मालपाणी यांनी स्पष्ट केले. हीरक महोत्सवी वर्षात बँकेच्या व्यवसायात ३३ टक्के वाढ झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

सभेच्या सुरुवातीला लक्ष्मी, साईबाबा आणि संस्थापक ओंकारनाथ मालपाणी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष देसाई यांनी सूत्रसंचालन करून मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. यावेळी सभासद गणेश बाहेती, मनीष मणियार, रामनाथ भंडारी, संजय क्षत्रिय, दिनेश सोमाणी, डॉ. जी. पी. शेख, महेश जाजू, ओंकार भंडारी, ओंकार बिहानी आणि बाळासाहेब देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नांना राजेश मालपाणी, संजय राठी व संतोष देसाई यांनी उत्तरे दिली.

# दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार !



अक्कलकोट : (स. गांवकरी)

दूधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी श्री. सिद्धाराम बाके आणि उपसभापतीपदी श्री. निंगाप्पा पुजारी यांची निवड झाल्याबद्दल दोघांचाही अभिनंदनपर सत्कार केला. यावेळी दोघांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच नव्या जबाबदारीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या हितासाठी भरीव काम घडावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली. खरंतर कृषी उत्पन्न बाजार समिती ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची व्यवस्था आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ, योग्य भाव आणि आवश्यक सुविधा मिळाव्यात, तसेच बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य मिळावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. तसेच शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळण्यासाठी बाजार समितीने प्रभावीपणे काम करणे गरजेचे असल्याचे मतही व्यक्त केले. यावेळी भाजपा सोलापूर जिल्हाध्यक्ष श्री. शशिकांत चव्हाण, नगराध्यक्ष श्री. मिलन कल्याणशेट्टी, उपसभापती श्री. सागर कल्याणशेट्टी, जि.प. सदस्य श्री. विकास बुळ्ळा, श्री. सिद्धाराम शिवमूर्ती, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्री. सुनील कळके, श्री. यशवंत तात्या धोंगडे, श्री. महेश हिडोळे, श्री. प्रवीण शहा, श्री. शिवशरण जोजन तसेच मंडल अध्यक्ष श्री. प्रदीप पाटील, श्री. सुनील खेड, श्री. महादेव पाटील, श्री. अमोल हिप्परगी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओतूर पोलिस ठाण्यात महिला दक्षता समिती स्थापन

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाणे येथे महिलांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या समस्या, तक्रारी आणि अडचणींना प्रभावीपणे व तातडीने प्रतिसाद मिळावा, यासाठी महिला दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची माहिती ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. या महिला दक्षता समितीत परिसरातील वैद्यकीय, न्याय, शिक्षण, पत्रकारिता, समाजकार्य तसेच विविध सामाजिक क्षेत्रांत कार्यरत असलेल्या महिलांचा समावेश करण्यात आला आहे. महिलांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून पोलिस प्रशासन आणि समाजातील महिलांमध्ये समन्वय साधण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाड, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे, बालविवाह तसेच महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध प्रश्नांबाबत जनजागृती करणे, पीडित महिलांना आवश्यक मार्गदर्शन मिळवून देणे आणि गरजेनुसार संबंधित यंत्रणेशी समन्वय साधणे, ही समितीची प्रमुख कामे असतील. तसेच महिला व मुलींमध्ये कायदेविषयक जनजागृती, स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन, शाळा-महाविद्यालयांमध्ये सुरक्षिततेविषयी प्रबोधन, महिलांच्या तक्रारी पोलिसांपर्यंत पोहोचविण्यासाठी पूल म्हणून काम करणे, तसेच संवेदनशील प्रकरणांमध्ये पीडितेला आवश्यक सामाजिक व कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, यावर समितीचा भर राहणार आहे. महिलांनी कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला किंवा अत्याचाराला घाबरून न जाता पुढे येऊन तक्रार करावी. त्यांच्या तक्रारींची गोपनीयता राखून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी पोलिस प्रशासन कटिबद्ध आहे. महिला दक्षता समितीच्या माध्यमातून 'महिला सुरक्षितता, जनजागृती आणि पोलिस-समाज समन्वय' अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक बाजगिरे यांनी सांगितले.


## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहिल्यानगर

महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालया शेजारी, अहिल्यानगर.
फोन नंबर – २३२६९१४ Email id :-ahmednagarfederationgmail.com

जा.क्र. पतसंस्था/फेडरेशन / १०२३/२०२६ दिनांक : २४/०८/२०२६

### स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस

नमुना 'झेड'

(नियम १०७पोट–नियम (११(ड–१)पहा.)

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी :– **श्रीकृष्ण ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., ब्राह्मणवाडा, ता. अकोले,** जि. अ. नगर द्वारा: **अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ. नगर,** महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीसीमध्ये नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिली असुन, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला / तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१मधील नियम १०७(११(ड–१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. २१/०८/२०२६ दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये. आणि व्यवहार केल्यास :– **श्रीकृष्ण ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., ब्राह्मणवाडा, ता. अकोले,** जि. अ. नगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

| अ. नं. | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटिस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भुमापन क्र. | क्षेत्र हे.आर चौ.मी | पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार – बाळू गंगाराम भागवत करिता जामि–दामु रभाजी आरोटे यांची मिळकत | दावा रक्कम रु.३५७४३/– दि.०१/०१/२०१९ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १९/११/२०२४ जप्ती नो.दि. २८/०२/२०२५ | ब्राह्मणवाडा ता. अकोले | ५१/७<br>५२/६ | ०.६५<br>०.२६ | मुळ नकाशा प्रमाणे |
| २ | कर्जदार – मच्छिंन्द्र नाथा आरोटे यांची मिळकत | दावा रक्कम रु.३१३४४/– दि.३१/१२/२०१८ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १९/११/२०२४ जप्ती नो.दि. २८/०२/२०२५ | ब्राह्मणवाडा ता. अकोले | ३३९/८पैकी | ०.२५पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| ३ | कर्जदार – गबाजी दगडु हुलवळे करिता जामिन – दगडु गोविंदा हुलवळे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४४९९०३/– दि. ३०/०९/२०२३ पासुन १५% व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. १९/११/२०२४ जप्ती नो. दि. २८/०२/२०२५ | जांभळे ता. अकोले | १६८ पैकी<br>१८९ पैकी<br>२०८ पैकी | ०.०८.७० पैकी<br>०.०२ पैकी<br>१.६८ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| ४ | कर्जदार – शांताराम विठ्ठल आरोटे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ३७७३२/– दि. ३१/१२/२०१८ पासुन १५% व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. १९/११/२०२४ जप्ती नो. दि. २८/०२/२०२५ | ब्राम्हणवाडा ता. अकोले | ३६५/२ पैकी<br>३७०/५ पैकी<br>३७०/१ पैकी<br>३७१/१ पैकी | २.३० पैकी<br>०.९२ पैकी<br>०.७९ पैकी<br>०.५० पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| ५ | कर्जदार – रमेश देवराम देठे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ३१५१२/– दि. ३०/१२/२०२५ पासुन १५% व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. १९/११/२०२४ जप्ती नो. दि. २८/०२/२०२५ | माणिक ओझर ता. अकोले | २५/२ पैकी<br>२५/३ पैकी<br>३४/२ पैकी<br>३६/१ पैकी<br>३६/३ पैकी | ०.०१.४० पैकी<br>०.१७.८० पैकी<br>०.९६ पैकी<br>०.१९.१० पैकी<br>०.०८.६० पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| ६ | कर्जदार – भगवान खंडु गायकर करिता जामिन – शांताराम विठ्ठल आरोटे यांची मिळकत जामिन – संपत सखाराम गायकर यांची मिळकत | दावा रक्कम रु. ७१०८६/– दि. ३१/१२/२०१८ पासुन १५% व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. १९/११/२०२४ जप्ती नो. दि. २८/०२/२०२५ | ब्राम्हणवाडा<br>ब्राम्हणवाडा ता. अकोले | ३६५/२ पैकी<br>३७०/१ पैकी<br>३७०/५ पैकी<br>३७१/१ पैकी<br>२३६/१ पैकी | २.३० पैकी<br>०.७९ पैकी<br>०.९२ पैकी<br>०.५० पैकी<br>०.९२ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| ७ | कर्जदार – चंद्रकांत रेवजी गोंदके करिता जामिन – गणपत दशरथ गायकर यांची मिळकत | दावा रक्कम रु. ६२७२०/– दि. ३०/९/२०१९ पासुन १५% व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. १९/०३/२०२२ जप्ती नो. दि. १०/०३/२०२३ | करंडी ता. अकोले | ३९/१ | ०.३१ | मुळ नकाशा प्रमाणे |

दिनांक – २७/०८/२०२६
स्थळ – अ.नगर

सही /–
**जे. डी. काळे**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या. अ.नगर


# तरुणांनी दशरथ सावंतांचा आदर्श घ्यावा : राजू शेट्टी

## अकोले येथे 'शेतकऱ्यांचा आसूड' पुरस्कार प्रदान; सुशीलाताई रुपवते यांच्या हस्ते सन्मान



### विचार करायला लावणारा सोहळा

दशरथ सावंत यांच्यासारख्या एका निस्वार्थी योद्ध्याचा झालेला हा सन्मान केवळ सत्कार नव्हता, तर तो महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर होता. सभागृहात उपस्थित असलेला प्रत्येक शेतकरी आणि तरुण नवी ऊर्जा घेऊन बाहेर पडला. हा सोहळा कृषी आणि सामाजिक चळवळीत महत्त्वाचा मैलाचा दगड ठरेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

अकोले : (स. गांवकरी)

आजचा शेतकरी चहूबाजूंनी संकटात सापडला असून निसर्गाचा लहरीपणा व व्यवस्थेची उदासीनता यामुळे बळीराजा होरपळत आहे. अशा भीषण परिस्थितीत केवळ सरकारकडे बोट दाखवून चालणार नाही. तरुणांनी पुढे येऊन आयुष्यभर शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या दशरथ सावंत यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शेतकरी नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले.

अकोले येथे राष्ट्र सेवा दलातर्फे ज्येष्ठ नेते व शेतकरी योद्धा दशरथ सावंत यांना सुशीलाताई दादासाहेब रुपवते यांच्या हस्ते 'शेतकऱ्यांचा आसूड' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शेट्टी बोलत होते. आज शेतकरी हतबल झाला असून धोरणांच्या जाळ्यात अडकला आहे. सावंत यांनी आयुष्यभर कोणत्याही पदाची किंवा पक्षाची अपेक्षा न ठेवता शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली. हाच त्यांचा खरा मानबिंदू आहे. त्यामुळे दशरथ सावंतांसारखे नेते तरुण पिढीने घडवणे गरजेचे असल्याचे शेट्टी यांनी नमूद केले. सुशीलाताई रुपवते म्हणाल्या की, शिक्षण, समाजसेवा आणि शेतकरी चळवळ या तिन्ही क्षेत्रांत सावंत अहोरात्र झटले. त्यांचा सन्मान म्हणजे केवळ एका कष्टकरी व्यक्तिमत्त्वाचा सत्कार नसून, तो समस्त शेतकरी बांधवांच्या अश्रूंची आणि आशांची जपणूक आहे. या सोहळ्यास बहुजन शिक्षण संघाचे चीफ ट्रस्टी ॲड. संघराज रुपवते, अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी, ज्येष्ठ शिक्षक नेते हिरालाल पगडाल, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले, कॉम्रेड कारभारी उगले, बबनराव नवले, कचरू पाटील शेटे, डॉ. सागर भालेराव, प्रा. मा. रा. लामखडे, प्रा. विठ्ठलराव शेवाळे, प्रकाश टाकळकर, अनिकेत घुले, रोहित ढाले, सचिन काकड, एम. डी. सोनवणे, राम चन्ना आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्र सेवा दलाचे राज्याध्यक्ष राजा कांदळकर यांनी प्रास्ताविकातून सोहळ्याची भूमिका आणि महात्मा फुले द्विशताब्दी वर्षातील संकल्प स्पष्ट केला. स्वागत अध्यक्ष आणि अकोले राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा. चंद्रशेखर हासे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय पांडे, प्रविण मालुंजकर, संतोष नवले, अमोल तळेकर, विशाल शिंदे, संपत वाळके, गणपत धुमाळ, शिवाजी भोर आदींसह राष्ट्र सेवा दल व छात्रभारतीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री यांच्या हस्ते 50 ई-बसेसचे लोकार्पण

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत ५० ई-बसेसचे नाशिककरांच्या सेवेत दाखल होत आहेत. या बसेसच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नाशिक शहरासाठी दाखल झालेल्या ५० ई-बसेसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री गिरीष महाजन, महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत नाशिक शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ मीटर लांबीच्या ५० ई-बसेस शहरात दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आधुनिक ई-बसेसचा समावेश झाल्यामुळे नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासही हातभार लागणार आहे. डिझेल बसेसच्या तुलनेत ई-बसेसच्या वापरामुळे परिचालन खर्चातही बचत होणार आहे. नाशिक शहराचा विकास आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यात आणखी बसेस उपलब्ध होणार असून त्यातून नागरिकांना अधिक व्यापक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.



# अडोबी इंडियाने सात राज्य सरकारांसोबत सहयोग केला

पुणे : (स. गांवकरी)

अडोबी या नाविन्यपूर्ण टूल्स आणि प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सर्जनशीलता, उत्पादकता व वैयक्तिक ग्राहक अनुभवांना सक्षम करणाऱ्या जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनीने शाळांमध्ये डिजिटल सर्जनशीलता आणि एआय कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिल्ली, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा, आसाम, बिहार आणि तामिळनाडू येथील राज्य सरकारांसोबत धोरणात्मक उपक्रमाची घोषणा केली आहे. राज्यांसोबत स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य करारांचा (एमओयू) भाग म्हणून, अडोबी हजारो सरकारी शाळांना अडोबी एक्स्प्रेस फॉर एज्युकेशन मोफत उपलब्ध करून देईल. हे डिजिटल मीडिया ॲप आहे, जे विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट्समध्ये गुंतवून ठेवून त्यांचे शैक्षणिक निकाल सुधारण्यास आणि भविष्यासाठी उपयुक्त कौशल्ये विकसित करण्यास मदत करते. या उपक्रमामुळे भारतातील के-१२ (बालवाडी ते १२ वी) श्रेणीतील अडोबी ची पोहोच देशभरातील शाळांमधील ७.८ दशलक्ष विद्यार्थी आणि शिक्षकांपर्यंत वाढली आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून, विद्यार्थी आणि शिक्षकांना अडोबी डिजिटल ॲकॅडमी अंतर्गत डिजिटल सर्जनशीलता आणि एआय कौशल्य-विकास अभ्यासक्रम देखील मिळेल. यामुळे सर्जनशील समस्या निवारण, डिजिटल स्टोरीटेलिंग आणि एआयच्या मदतीने कंटेंट तयार करण्यामध्ये प्राविण्य मिळवता येईल, जे राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या भविष्य-सज्ज शिक्षणाच्या दृष्टिकोनाला पुढे नेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. वर्गखोलीतील अध्यापनात डिजिटल सर्जनशीलतेचा समावेश कसा करावा याचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले जाईल, तर विद्यार्थी शाळेतील प्रकल्प आणि सर्जनशील अभिव्यक्तीसाठी अडोबी एक्स्प्रेसचा वापर करतील.

## थोडक्यात बातम्या...



### पुण्यात १ ते ३ सप्टेंबरदरम्यान 'उर्गेंन आर्ट फेस्टिव्हल'

पुणे (स. गांवकरी) : करुणादिप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १ ते ३ सप्टेंबरदरम्यान पुण्यात ' उर्गेंन आर्ट फेस्टिव्हल २०२६' आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय महोत्सवात चित्रप्रदर्शने, ध्यान कार्यशाळा, कलाकार व साहित्यिक परिसंवाद, चित्रपट प्रदर्शन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती माजी चीफ मेडिकल ऑफिसर , डिफेन्स इस्टेट , इंडिया , संस्थापक करुणादीप फाऊंडेशन आणि उर्गेन आर्ट ग्लोबल डॉ. जीवक ( व्ही. डी. गायकवाड )यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डॉ अस्मिता गायकवाड,डायरेक्टर फोर्टरिया आणि उपाध्यक्षा करुणादीप फाऊंडेशन, जागतिक कीर्तीचे चित्रकार सविंद्र सावरकर आणि कलादिग्दर्शक संतोष संखद आदि मान्यवर उपस्थित होते.




### संजीवनी करंडक वीर शिवराज मंडळ ट्रस्टने पटकावला

पुणे (स. गांवकरी) : संजीवनी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'संजीवनी करंडक सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धा २०२५' चा पारितोषिक वितरण समारंभ शिवदर्शन येथील स्व. राजीव गांधी ई-लर्निंग प्रेक्षागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. स्पर्धेतील मानाचा 'संजीवनी करंडक' वीर शिवराज मंडळ ट्रस्टने पटकावला. या कार्यक्रमास संजीवनी मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय विद्वांस, कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोहिते, आदर्श मंडळाचे अध्यक्ष उदय जगताप, साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा, दर्शन मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश घोश, नगरसेवक महेश वाबळे, शिवव्याख्याते सौरभ कर्डे, राजेंद्र भिडे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### दिव्यात शेकडो महिलांनी नगरसेवक शैलेश पाटील यांना बांधली राखी



ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील शेकडो महिलांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवसेना उपशहर प्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात रक्षाबंधनाचा पवित्र सण मोठ्या उत्साहात आणि आपुलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी दिवा शहरातील शेकडो महिलांनी शैलेश पाटील यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यंदा रक्षाबंधनाला कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात तसेच विविध सामाजिक प्रश्नांमध्ये शैलेश पाटील हे सातत्याने नागरिकांच्या पाठीशी उभे राहत असल्याने महिलांनी त्यांच्याबद्दल आपुलकी व विश्वासाची भावना व्यक्त केली. रक्षाबंधनाच्या या स्नेहपूर्ण सोहळ्यात महिला आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी महिलांनी शैलेश पाटील यांना दीर्घायुष्य लाभावे, उत्तम आरोग्य लाभावे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी त्यांना सदैव बळ मिळावे, अशा शुभेच्छा दिल्या. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून दिवा शहरातील महिला आणि शैलेश पाटील यांच्यातील आपुलकीचे व विश्वासाचे नाते अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.

### अध्यक्षपदी बाजीराव शिंदे तर रेवण वलव्हणकर बिनविरोध



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : उदापुर ता:- जुन्नर येथील महात्मा गांधी तंटामुक्तीसमिती च्या अध्यक्षपदी बाजीराव शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आल्याची माहिती सरपंच व प्रशासक सचिन आंबडेकर यांनी दिली. सोमवार दिः-२४ ऑगस्ट २६ रोजी स्वातंत्र्य दिनाची ग्रामसभा उदापुरचे सरपंच व विद्यमान प्रशासक सचिन आंबडेकर यांच्या अध्यक्षते खाली ग्रामपंचायत सभागृहात आयोजित करण्यात आली होती.यावेळी उदापुर गावच्या महात्मा गांधी तंटामुक्त समिती च्याअध्यक्षपदी काम करण्याची बाजीराव शिंदे, अनिल रोकडे,अमोल म्हसणे अजिंक्य म्हसणे, पांडुरंग बेळे, बाजीराव कुलवडे,दिलीप आरोटे व सुधाकर भास्कर, दिनेश भास्कर यांच्यासह या अकरा तर उपाध्यपदासाठी रेवण वलव्हणकर,बाळू माळवे या व्यक्तीनी इच्छा व्यक्त केली.त्यानंतर सर्व इच्छुकांनी एकत्र चर्चा करून व ग्रामस्थांनी मध्यस्थी करून सर्वानुमते एकमत करुन अध्यक्ष म्हणून बाजीराव शिंदे तर उपाध्यक्षपदी रेवण वलव्हणकर यांची उदापुरच्या महात्मा गांधी तंटामुक्त समिती निवड करण्यात आली. बाजीराव शिंदे यांना तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष म्हणून ही दुसऱ्यांदा संधी प्राप्त झाली असून प्रथम कार्यकाळातील उत्कृष्ट कामाची पावती म्हणून त्यांनी उदापुरच्या समितीतीला महाराष्ट्र शासनाने प्रथम क्रमांक पटकावला होता व पाच लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले होते.

# रक्षाबंधनानिमित्त 'रोड सेफ्टी राखी-२०२६' उपक्रमाचे आयोजन

## वाहतूक नियमांचे पालन करून रस्ते सुरक्षित करण्याचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांचे आवाहन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहर वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि 'सेफर इंडियन रोड्स' यांच्या संयुक्त विद्यमाने 'रोड सेफ्टी राखी-२०२६' या अभिनव जनजागृती उपक्रमाचे आज येथील वझीराबाद सर्कल रोड, पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी वाहनचालक व नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे तसेच रस्त्यावरील इतर वापरकर्त्यांचा आदर करण्याचे आवाहन केले. जीवघेणे रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे योगदान महत्त्वाचे आहे. वाहनचालकांनी सतर्क व सुरक्षित वाहन चालविण्याचे कौशल्य आत्मसात करावे, असे त्यांनी सांगितले. बहुतांश जीवघेणे अपघात हे मानवी चुका तसेच रस्ते सुरक्षेच्या नियमांकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे घडतात. त्यामुळे नागरिकांनी रस्ता सुरक्षेबाबतच्या सूचनांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्या आपल्या कुटुंबीय व प्रियजनांपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. पालकांनी अल्पवयीन मुलांना योग्य वाहन चालविण्याचे प्रशिक्षण आणि वैध वाहन परवाना मिळेपर्यंत कोणतेही वाहन चालविण्यास प्रोत्साहन देऊ नये. तसेच पादचाऱ्यांनी सुरक्षिततेसाठी पदपथांचा वापर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नांदेड शहर वाहतूक पोलीस महानगरपालिका प्रशासनाच्या समन्वयाने शहरातील पदपथांवरील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करीत आहेत. शहरातील रस्ते वाहनचालक, पादचारी आणि सर्व नागरिकांसाठी अधिक सुरक्षित करण्यासाठी नागरिकांनी पोलीस व महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही पोलीस अधीक्षकांनी केले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने रस्ता सुरक्षेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविणारा हा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी नांदेड शहर वाहतूक पोलीस अधिकारी-कर्मचारी तसेच 'सेफर इंडियन रोड्स'च्या सदस्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास वाहतूक पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, 'सेफर इंडियन रोड्स'चे सदस्य घनशाम ओझा, महेश तिवारी, सोनू उपाध्याय, अंबादास जोशी, तरुण तिवारी, सिमरन तिवारी, राजश्री अडबलवार, वरुण तिवारी, सय्यद जैद अली, नेताल तिवारी, सृष्टी उपाध्याय, राघव तिवारी यांच्यासह नांदेड शहर वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कै. रघुनाथ शिंदे पाटलांनी मुलांना दिली 'सुसंस्कृतीची इस्टेट'

शिवनेरी : (स. गांवकरी)

■ ह.भ.प. ज्येष्ठ कीर्तनकार संतदास मनसुख यांचे दशक्रिया विधीप्रसंगी प्रबोधन

जीवनाला यथार्थ अर्थ प्राप्त करून द्यायचा असेल, तर चांगली संगत, समग्र विचार आणि सत्प्राप्ती अत्यंत महत्त्वाची आहे. आपल्या लेकरांसाठी संपत्तीबरोबरच संस्कारांची शिदोरी देणे गरजेचे आहे. कै. रघुनाथ भागुजी शिंदे पाटील (वय ८२, रा. उदापूर) यांनी आपल्या मुलांना व सुनेला भौतिक संपत्तीपेक्षा 'सुसंस्कृतीची इस्टेट' देऊन ठेवली, असे प्रतिपादन ह.भ.प. ज्येष्ठ कीर्तनकार संतदास मनसुख यांनी केले.



पुष्पा नदी येथे कै. रघुनाथ भागुजी शिंदे पाटील यांच्या दशक्रिया विधीनिमित्त आयोजित प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी परिसरातील बहुसंख्य नागरिक, वारकरी व भाविक उपस्थित होते.

मनसुख महाराज म्हणाले, "उन्हाळ्याच्या दिवसांत झाडांवर पक्ष्यांसाठी पाणी आणि धान्य ठेवावे. पक्षी ते पाणी व धान्य ग्रहण करून जातात, तेव्हा त्यापेक्षा मोठे आणि पवित्र कर्म दुसरे नाही. आपला प्रपंचही गोंडस आणि संस्कारित असला पाहिजे. चांगली मुले जन्माला येण्याइतकेच त्यांना चांगले संस्कार देणे महत्त्वाचे आहे."

# बाबुराव इंगळे यांच्यावर कासराळी येथे अंतिम संस्कार

बिलोली : (स. गांवकरी)

बिलोलीचे जेष्ठ पत्रकार कासराळी येथील रहिवाशी बाबुराव इंगळे यांच काल दि. २७ आँगस्ट गुरुवार रोजी नांदेड येथे रुग्णालयात उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले. आज त्यांच्या पार्थिव देहावर कासराळी येथे मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थित शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. गेल्या तीन दशका पुर्वी पासुन अभ्यास पुर्वक निर्भिडपणे पत्रकारीता क्षेत्रामध्ये काम करीत आसताना आपल्या लेखनीच्या माध्यमातून अंतिमश्वासाच्या घटनेपर्यंत शेतकरी, शेतमजुर आशा विविध क्षेत्रासह शेवटच्या घटका पर्यंत न्याय मिळुन देण्यासाठी त्यांची सततच धडपड कायम आठवणीत राहील त्यांच्या अभ्यासपुर्व निर्भिड लेखनीची ओळख तालुक्यासह सर्वदुर होती. आसा हा मनमिळाऊ धुरंदरबाज पत्रकार गेल्या काही महीण्या पासुन कर्करोगाच्या आजारावर मुंबई, संभाजीनगर,नांदेड येथे उपचार घेत आसताना गेल्या तिन दिवसापुर्वी आचानक तब्येत बिघडल्यामुळे नांदेडच्या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान दि. २७ आँगस्ट रोजी दुःखद निधन झाले. ते ५८वर्षाचे होते.हि धक्कादायक दुःखद बातमी समाज माध्यमावर प्रसारीत होताच समाज माध्यमावर मित्र परीवारांकडुन भावपूर्ण श्रद्धांजलीचा ओघ चालुच होता.आज दि. २८ आँगस्ट शुक्रवार रोजी दुपारी मुळगावी कासराळी च्या स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ,भावजय,दोन मुली,दोन मुल आसा परीवार आहे. या वेळी आमदार जितेश अंतापुरकर,दैनिक देशोन्नती आवृती प्रमुख अनिल कसबे माजी शिक्षण सभापती संजयआप्पा बेळगे उद्योजक भागवत सावकार लोकमनवार मा. जि. प. सदस्य संग्राम हायगले कासराळीचे मा. सरपंच अरविंद ठक्करवाड नगरसेवक प्रकाश पोवाडे दिलीप पांढरे, पांडुरंग रामपुरे,शंकर व्यंकम, बाबुराव चरकुलवार,बालाजी गेंदेवाड सर यांच्यासह विविध क्षेत्रातील जनसमुदाय व पत्रकार बांधव मोठ्या संख्येनी उपस्थित होते.



# अन्यायाविरोधात लढणारा समाज घडला पाहिजे

भोकर : (स. गांवकरी)



## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त प्रा. रामचंद्र भरांडे यांचे प्रतिपादन

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा विचार केवळ वाचनापुरता मर्यादित न ठेवता तोy आचरणात आणण्यासाठी समाजाने शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा स्वीकार करणे गरजेचे आहे. महामानवांना अपेक्षित असा अन्यायाविरोधात लढणारा आणि स्वाभिमानाने उभा राहणारा समाज घडला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. रामचंद्र भरांडे यांनी केले.

भोकर येथे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त २५ ऑगस्ट रोजी आयोजित सभेत ते बोलत होते. जयंतीनिमित्त शहरातील नियोजित पुतळ्याच्या जागेवर तसेच क्रांतीवीर लहुजी साळवे चौक येथे अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रा. भरांडे म्हणाले की, अण्णाभाऊ आपल्या माणसांविषयी लिहिताना अत्यंत संवेदनशील होते. त्यांच्या साहित्यामधील माणसे कष्टकरी, नीतिमान, प्रामाणिक, शौर्यशाली आणि स्वाभिमानी आहेत. अण्णाभाऊंनी साहित्य-वाङ्मयाला समाजाचा 'तिसरा डोळा' म्हटले आहे. ते लिहित होते, गात होते आणि त्याचबरोबर अन्यायाविरोधात लढत होते. संघर्ष करताना तुरुंगात जाण्याची वेळ आली तरी त्यांनी माघार घेतली नाही.

सामान्य माणसाला न्याय मिळवून द्यायचा असेल तर आघाडीवर राहून संघर्ष केला पाहिजे, ही अण्णाभाऊंची भूमिका होती. त्यांचा लढा कोणत्याही एका जातीपुरता मर्यादित नव्हता, तर तो शोषितांच्या हक्कासाठी होता, असेही प्रा. भरांडे यांनी स्पष्ट केले.

क्रांतीवीर लहुजी साळवे आयोगाचा मुद्दा उपस्थित करताना प्रा. भरांडे यांनी सांगितले की, आयोग मंजूर झाला त्याच वेळी म्हणजे २०११ मध्येच हा प्रश्न निकाली निघणे अपेक्षित होते. मात्र, सरकारने हा प्रश्न सोडविण्याऐवजी तो चिघळत ठेवला, असा आरोप त्यांनी केला.

यावेळी पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, माजी सभापती बाळासाहेब रावणगावकर, शेख युसुफ, ढगे पाटील, उत्तम बाबळे, विठ्ठल धोंडगे, मनोज गिमेकर, डॉ. बालाजी अंदबोरीकर, संजय बरकमकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. जयंतीनिमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली. जयंती मंडळाचे अध्यक्ष विकास वाघमारे, अनिल डोईफोडे, दिलीप वाघमारे, सुभाष भालेराव, सखाराम मोरे, महेंद्र किनीकर, बाळासाहेब टिकेकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तम बाबळे यांनी केले. सूत्रसंचालन के. वाय. देवकांबळे यांनी केले, तर बाळासाहेब टिकेकर यांनी आभार मानले.

# हसरतेंचा चौथा सीझन पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला, इच्छा, संघर्ष आणि स्वतःचा शोध घेणाऱ्या सहा धाडसी कथा

मुंबई : (स. गांवकरी)

हंगामा ओटीटी वरील हसरतें ही सीरिज चौथ्या सीझनसह पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. महिलांच्या इच्छा, धैर्य आणि स्वतःचे आयुष्य नव्याने घडवण्याच्या प्रवासावर आधारित ही सीरिज यावेळी त्यांच्या खासगी आयुष्यातील भावनिक संघर्षांवर अधिक प्रकाश टाकते. पहिल्या तीन सीझनला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर, या नव्या सीझनमध्ये महिलांच्या मनातील आणि बंद दरवाजांआड सुरू असलेल्या संघर्षांची अधिक खोलवर कथा दाखवण्यात येणार आहे. शांत आणि संयमी दिसणाऱ्या महिलांच्या मनात असलेली इच्छा, बंडखोरी आणि स्वतःशीच सुरू असलेली झुंज या सीझनमध्ये पाहायला मिळणार आहे. या सीझनमध्ये एकमेकांशी जोडलेल्या सहा कथा दाखवण्यात आल्या आहेत. या कथांमधून कर्तव्य आणि स्वतःच्या इच्छांमध्ये अडकलेल्या महिलांचा प्रवास पाहायला मिळतो. स्वतःवर लादलेले नियम मोडण्याची, आतापर्यंत मनात दडवून ठेवलेल्या भीतीचा सामना करण्याची आणि आपल्या इच्छा, भावना व्यक्त करून आयुष्य मनापासून जगण्याचा अधिकार पुन्हा मिळवण्याची त्यांची धडपड या कथांमधून दिसून येते. हसरतें सीझन 4 चा प्रीमियर हंगामा ओटीटी वर 25 ऑगस्टपासून झाला आहे. दर आठवड्याला दोन नवीन भाग प्रदर्शित केले जातील. पहिले दोन भाग 'छू कर मेरे मन को' आणि 'फाइंडिंग व्हॉइस' हे 25 ऑगस्टला प्रदर्शित झाले. 'छू कर मेरे मन को' मध्ये नात्यांमधील तणाव आणि तुटलेली नाती सुधारण्याचे काम करणाऱ्या एका कुशल इंटिमसी थेरपिस्टला तिच्या आयुष्यातील अशा पुरुषाचा सामना करावा लागतो, ज्याने एकेकाळी तिचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान तोडला होता. या अनुभवातून तिला जाणवते की खरे जवळचे नाते स्वतःवर प्रेम करण्यापासून आणि स्वतःला स्वीकारण्यापासून सुरू होते. 'फाइंडिंग व्हॉइस' मध्ये प्रसिद्ध पतीच्या छायेत अडकलेली आणि स्वतःचा आवाज गमावलेल्या गायिकेची कथा आहे. आयुष्यातील सर्व काही गमावल्याच्या रात्री ती तिचा आवाजही गमावते. मात्र, एका अनोळखी व्यक्तीचा तिच्यावरचा विश्वास तिला पुन्हा स्वतःचा आवाज आणि आत्मविश्वास मिळवून देतो.




'झटपट आरती' आणि 'मकान मालिक' हे भाग 1 सप्टेंबरला प्रदर्शित होतील. 'झटपट आरती' मध्ये एका छोट्या घरगुती स्वयंपाकी महिलेची कथा आहे. तिच्या महत्त्वाकांक्षेवर आणि तिच्या कर्तृत्वावर सतत प्रश्न उपस्थित केले जातात. मात्र, ती आपल्या स्वप्नांसाठी आणि स्वाभिमानासाठी लढण्याचा निर्णय घेते. तिच्या आयुष्याचा निर्णय तिच्या 'पवित्रते'वर नाही, तर तिच्या धैर्यावर ठरते, हे ती सिद्ध करते.

'मकान मालिक' मध्ये एका एकट्या आईची कथा आहे. ती शांतपणे आणि खंबीरपणे आपले आयुष्य सांभाळत असते. अनेक वर्षांनंतर पहिल्यांदाच ती कोणावर तरी विश्वास ठेवून आपले मन मोकळे करते. मात्र, ज्या पुरुषावर तिने विश्वास ठेवला, तो दिसतो तसा अजिबात नसल्याचे तिला समजते.

'रनअवे मदर' आणि 'यू आर प्रिटी' हे भाग 8 सप्टेंबरला प्रदर्शित होतील. 'रनअवे मदर'मध्ये एका अशा आईची कथा आहे, जी अत्याचारी पतीपासून वाचण्यासाठी तीन वर्षांपासून घरापासून दूर राहते. आता तिला सोडून दिलेल्या त्या घरात परतावे लागते. पुन्हा स्वतःमधील निडर स्त्रीला शोधून ती आपले आयुष्य नव्याने उभे करते आणि अखेर पळत राहणे थांबवते.

'यू आर प्रिटी'मध्ये पतीकडून अपमानित झालेल्या पत्नीची कथा आहे. पतीने तिला जणू काही ती अस्तित्वातच नाही, अशा प्रकारे दुर्लक्षित केले आहे. मात्र, ती पुन्हा स्वतःच्या शरीरावर, व्यवसायावर आणि स्वतःच्या किमतीवर विश्वास ठेवायला शिकते. त्यानंतर ती स्वतःच्या अटींवर पुन्हा आपल्या आयुष्यात परतते. हसरतेंच्या चौथ्या सीझनमध्ये अनेक दमदार कलाकारांचा समावेश आहे. यामध्ये निशा रावल, ध्रुव चौधरी, मीरा देवस्थळे, झान खान, आकांक्षा पुरी, रेयांश वीर चड्ढा, चाहत खन्ना, अंश बागरी आणि अमिका शैल हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५६ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार दि. २९ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतले श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन!



शिर्डी (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी गुरुवारी शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी देशाच्या व राज्याच्या प्रगतीसह सर्वसाम ान्य नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार यांच्या शिर्डी भेटीमुळे साईभक्तांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाचा उपयोग आवश्यक

नाशिक (समर्थ गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या माध्यम ातून शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे. मात्र शेतकऱ्याला कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी नव्या तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्था उभी करावी लागेल. त्यासाठी कृषी क्षेत्रातील आव्हाने लक्षात घेऊन आधुनिकीकरण, नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाचा वापर करून उत्पादनखर्च कमी करीत उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी महाविद्यालयांनी महत्वाची भूमिका बजवावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (उच् उर्श्रीशपवीर त्रख़पर्रीळी) यांनी केले. मराठा विद्या प्रसारक सम ाज संस्थेच्या दिंडोरी तालुक्यातील मौजे चाचडगाव येथीलकर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील कृषी म हाविद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी जलसंपदामंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे, नाशिक महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके आदी उपस्थित होते.

राज्यात ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक असून त्यांची गुंतवणूक करण्याची क्षमता कमी आहे. शेतीचा उत्पादन खर्च वाढतो आहे. या तुलनेत हमीभावामुळे शेतकऱ्यांना विशेष लाभ मिळत नाही. यातून मार्ग काढण्यासाठी शेती क्षेत्रातील संशोधनाला चालना द्यावी लागेल आणि हे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या म हाविद्यालयांची आवश्यकता आहे. या महाविद्यालयातील सुविधा लक्षात घेता नाशिकमध्ये भविष्यात होणाऱ्या कृषी संशोधनात हे महाविद्यालय अग्रेसर असेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. नाशिक जिल्हा कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे. येथील शेतकरी अत्यंत मेहनती आहेत. आदिवासी भागातही विविध वनउपज तयार केली जाते. देशाच्या द्राक्ष निर्यातीच्या ८० टक्के निर्यात नाशिक जिल्ह्यातून होते. नाशिक जिल्ह्यातला कांदा संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. शेती फायदेशीर करायची असेल तर शेतीच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा उपयोग होणे अत्यंत म हत्वाचे आहे. देशातील अनेक राज्य कृषी उत्पादकतेत मागे पडली आहेत. रासायनिक खतांच्या अतिउपयोगामुळे



मातीची क्षमता कमी झाली आहे. म्हणून राज्य शासन कमी खतांच्या वापरात अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला चालना देत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. नवे तंत्रज्ञान, नवीन संशोधन याच्या साह्याने कृषी महाविद्यालयांनी जमिनीचा पोत ओळखून खतांचा वापर करण्याचे मार्गदर्शन केल्यास शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल.

## संक्षिप्त

### सप्टेंबरमध्ये १२ दिवस बँका बंद!

मुंबई (समर्थ गांवकरी)

सप्टेंबर महिन्यात बँकेशी संबंधित म हत्त्वाची कामे असतील, तर ती आधीच पूर्ण करून घेणे ग्राहकांसाठी फायदेशीर ठरणार आहे. विविध सण, नियमित साप्ताहिक सुट्ट्या आणि बँक कर्मचाऱ्यांच्या देशव्यापी संपामुळे सप्टेंबरमध्ये देशभरातील बँकांच्या शाखा एकूण १२ दिवस बंद राहण्याची शक्यता आहे. यामध्ये बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी पुकारलेल्या चार दिवसांच्या देशव्यापी संपाचा समावेश आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने (UFBU) ११ सप्टेंबर रोजी एक दिवसाचा, तर २८, २९ आणि ३० सप्टेंबर रोजी सलग तीन दिवसांचा संप जाहीर केला आहे.

### पूरग्रस्त नेपाळसाठी भारताची 'एअर रिलीफ'

वायुसेनेने पोहोचवली ४७.५ टन मदत

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

नेपाळमध्ये हिमनदीचा मोठा भाग तुटल्याने आलेल्या विनाशकारी पुरामुळे झालेल्या हानीचा सामना करण्यासाठी भारतीय वायुसेना मदत आणि बचाव कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आपत्तीच्या काही तासांतच वायुसेनेने सी-१३०जे विमानाद्वारे १० टन आवश्यक मदत सामग्री नेपाळमध्ये पोहोचवली. यामध्ये औषधे, तात्पुरते निवारे, ब्लँकेट आणि हायजीन किट्सचा समावेश होता. दुसरी खेप घेऊन वायुसेनेच्या सी-१७ ग्लोबमास्टर विमानाने ३७.५ टन अतिरिक्त मदत सामग्री (अन्न पाकिटे आणि आवश्यक औषधे) घेऊन काठमांडूसाठी उड्डाण केले. भारताने आतापर्यंत एकूण ४७.५ टन मदत सामग्री नेपाळला पाठवली आहे.

### मुंबईत तरुणाला धावत्या लोकलमधून लाथ मारून खाली पाडले

आरोपीला अटक

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबईतील धावत्या लोकलमधून तरुणाला लाथ मारून खाली पाडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लोकलच्या दरवाजात उभे राहण्यावरून झालेल्या वादातून २४ वर्षीय तौसिफ शेख याला सहप्रवाशाने लाथ मारल्याचे समोर आले आहे. या घटनेत तौसिफ गंभीर जखमी झाला असून रेल्वे पोलिसांनी राहुलकुमार पांडे (३०) याला अटक केली आहे. किरकोळ वादाचे रूपांतर थेट जीवघेण्या प्रकारात झाल्याने मुंबई लोकलमधील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### कांदा एक्सप्रेस आता चेन्नईला !

मनमाडहून ८०० टन कांदा रवाना होणार

नाशिक (समर्थ गांवकरी)

देशभरात कांद्याच्या भावात अचानक वाढ झाल्यानंतर सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदीचा निर्णय घेतला आहे. त्याच पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथून पहिली कांदा एक्सप्रेस दिल्लीला रवाना झाल्यानंतर आता मनम ाडहूनही कांदा एक्सप्रेस धावणार आहे. मनमाड रेल्वे स्थानकातून तब्बल ८०० मेट्रिक टन कांदा चेन्नईला पाठवला जाणार आहे. यासाठी रेल्वेच्या २१ बोगींमध्ये कांदा भरण्याचे काम सुरू असून, संध्याकाळपर्यंत ही कांदा एक्सप्रेस चेन्नईच्या दिशेने रवाना होणार आहे. कांदा एक्सप्रेस आता चेन्नईला : कांद्याच्या दरात वाढ होताच केंद्र सरकारने बाजारातील दर नियंत्रणात आणण्यासाठी नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यम ातून खरेदी केलेला बफर स्टॉकमधील कांदा देशातील विविध बाजारपेठांमध्ये पाठवण्याचे नियोजन केले आहे. याच अंतर्गत दोन दिवसांपूर्वी नाशिकच्या लासलगाव रेल्वे स्थानकातून ४५० मेट्रिक टन कांदा घेऊन पहिली कांदा एक्सप्रेस दिल्लीच्या दिशेने रवाना झाली होती.

# सिंहस्थ महाकुंभची सर्व कामे वेळेतच पूर्ण करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नाशिकमध्ये तीन दिवसीय महाकुंभ भक्ती संगम सोहळ्याची सुरुवात

नाशिक (समर्थ गांवकरी)

सिंहस्थ कुंभमेळ्याचा कालावधी लक्षात घेता विविध कामे वेगात सुरू आहेत. सर्व संबंधित यंत्रणा ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. भारतीय संस्कृतीचा सर्वात मोठा अविष्कार असलेल्या या महासोहळ्याची सर्व कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे ठक्कर डोम येथे आजपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, शालेश शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, खासदार शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने उत्तम सुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साधुग्रामची जागा अडीच हजार कोटी रुपये खर्च करून कायमस्वरूपी अधिग्रहीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या जागेचा उपयोग भविष्यातही कुंभम ेळ्यासाठीच व्हावा, यासाठी त्यांची योग्य पद्धतीने व्यवस्था करण्यात येणार आहे. कुंभमेळ्यासाठी रस्ते, पायाभूत सुविधा तसेच भाविकांसाठी आवश्यक विविध नागरी सुविधा विकसित करण्यात येत आहेत. साधुग्रामच्या जागांबाबत काही नागरिक व शेतकऱ्यांच्या तक्रारी असल्यास त्या संवेदनशीलतेने त्या दूर करण्यात येतील. शक्य त्या सुधारणा करण्यात येऊन



संबंधितांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, कुंभमेळ्यासाठी खर्च होणाऱ्या निधीतून नाशिक, त्र्यंबकेश्वरसह जिल्ह्यात दीर्घकाळासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण होणार आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. याची जाणीव शासन-प्रशासनाला असून कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिक निश्चितपणे या कामांचे स्वागत करतील. सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी वेळेच्या मर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे. तसेच इतर सर्व संबंधित विभागांनी कामांना गती दिली आहे. कामांमध्ये येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सर्वांच्या सहकार्याने सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी दर्जेदार, पारदर्शक पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण करून हा कुंभमेळा सुरक्षित, सुव्यवस्थित आणि यशस्वी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## काठमांडू व सागा (चीन) येथे अडकलेल्यांच्या मदतीसाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू

### रायगड, अहिल्यानगर, नागपूर जिल्ह्यातील नागरिक परत येण्यासाठी सुरक्षितरित्या मार्गस्थ

मुंबई (समर्थ गांवकरी)

नेपाळमधील काठमांडू व चीनमधील सागा (चीन) येथे पर्यटन साठी गेलेल्या राज्यातील विविध जिल्ह्यातील नागरिकांना सुरक्षित परत आणण्याचे प्रयत्न सुरू असून यादृष्टीने केंद्र सरकार, नेपाळ व चीन सरकारच्या माध्यमातून कार्यवाही करत असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे.

आत्तापर्यंत प्राप्त माहितीनुसार रायगड, अहिल्यानगर, नागपूर यासह अनेक ठिकाणचे नागरिक सुरक्षितरित्या परत येत आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ट्रॅव्हल्सचे टूर ऑपरेटर दर्शन गुंजाळ यांनी ४५ जणांच्या ग्रुपमध्ये अहिल्यानगर (२७), नाशिक(१२), पुणे(५), मुंबई (१) जिल्ह्यातील नागरिकांचा समावेश असल्याची माहिती दिली. हा ग्रुप नेपाळ येथील चितवन येथे आहे. सर्वजण सुखरूप आहे. सदर ग्रुप नेपाळमधील लुंबिनी येथे पोहोचणार आहे. लुंबिनी येथे मुक्काम करून उद्या आयोध्याकडे निघणार असल्याचे श्री गुंजाळ यांनी कळविले आहे.

ट्रॅव्हल्सच्या निर्मलाताई गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली हा ग्रुप नेपाळमध्ये आहे. सर्व नागरिक सुखरूप आहेत.सद्यस्थितीत काठमांडूकडे जाणारे मार्ग बंद असल्यामुळे ते लुंबिनीकडे जाणार असून तेथून पुढे आयोध्याकडे जाण्याचे त्यांचे नियोजन आहे. सद्यस्थितीत त्यांना शासन स्तरावरून मदतीसाठी प्रयत्न केले जात आहे.

रायगड जिल्ह्यातील जय गिरनारी शिवदत्त मंदिर ट्रस्टच्या वतीने ३७ व्यक्ती नेपाळ येथे दर्शन व पर्यटनासाठी गेल्या आहेत. सध्या सर्व जण सागा (चीन ) येथे सुरक्षित आहेत. त्यांचे काठमांडू येथून २९ रोजी भारतात परतण्यासाठी विमान आहे. सर्व जण पर्यायी मार्गाने काठमांडूकडे आज सकाळी रवाना झाले असून सायंकाळ पर्यंत काठमांडू एअरपोर्टला पोहचतील. ते उद्या येतील, अशी माहिती नातेवाईक दिलीप शेठ यांनी दिली आहे. सर्वांची तब्येत ठीक असून त्यांच्यापैकी दोघे डॉक्टर आहेत.

नागपूर जिल्ह्यातील सर्व १०६ नागरिक सुखरूप असून, नागपूर जिल्हा प्रशासन यांचा त्यांच्याशी सातत्याने संपर्क असून त्यांच्या सुरक्षित परतीच्या प्रवासाबाबत आवश्यक समन्वय व देखरेख करण्यात येत आहे. त्यापैकी ४ नागरिक विमानाने दिल्ली येथे सुखरूप पोहोचले असून, उर्वरित १०२ नागरिक बसमार्गे भारतात दाखल झाले आहेत. १०२ नागरिक बिहार राज्यातील सीतामढी जिल्ह्यात असून, आज रात्री ते पटना येथे पोहोचून तेथे मुक्काम करणार आहेत. त्यानंतर उद्या २९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ वाजताच्या रेल्वेने पटना येथून नागपूरकडे रवाना होणार आहेत.

# संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नविन वास्तूमध्ये उत्साहात संपन्न

### ३ कोटी ४१ लाखांचा नफा; सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर

### १५६ कोटी ३५ लाखांच्या ठेवींसह संस्थेची भक्कम आर्थिक वाटचाल; सभासदांचा विश्वास हीच संस्थेची खरी ताकद

संगमनेर (समर्थ गांवकरी)

नाशिक विभाग कार्यक्षेत्र असलेल्या व संगमनेर तालुक्यात अग्रगण्य असलेल्या संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी संस्थेच्या भव्य वास्तूमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेने ३ कोटी ४१ लाख रुपयांचा नफा मिळविला असून, संस्थेच्या या उल्लेखनीय आर्थिक कामगिरीबद्दल सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या शिस्तबद्ध सहकार विचारांचा वारसा आणि लोकनेते मा. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनातून संस्थापक मा. डॉ. सुधीर तांबे, संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे व मा. आमदार सत्यजितदादा तांबे यांच्या नेतृत्वाखाली संग्राम पतसंस्थेने सातत्याने प्रगतीची नवी शिखरे गाठली आहेत.

संस्थेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस अधिक भक्कम होत असून, संस्थेकडे १५६ कोटी ३५ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे भागभांडवल १ कोटी ८८ लाख रुपये, कर्जवाटप १३२ कोटी ९९ लाख रुपये, तर गुंतवणूक ५५ कोटी ४७ लाख रुपये आहे. तसेच संस्थेकडे ११ कोटी २० लाख रुपयांचा राखीव निधी व २९ कोटी ८६ लाख रुपयांचा स्वनिधी असून, स्थापनेपासून संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त आहे.

नवीन वास्तूसह आधुनिक सुविधांचा संकल्प

यावेळी संस्थापक मा. डॉ. सुधीर तांबे यांनी संस्थेच्या नवीन वास्तूचे काम पूर्ण झाल्याचे सांगून सभासदांना आधुनिक व तत्पर सेवा देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. चांगल्या कर्जदारांना योग्य कर्जपुरवठा करण्याबरोबरच छोट्या कर्जदारांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यावर संस्थेने भर द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, अमृतवाहिनी सहकारी बँकेचे चेअरमन मा. श्री. सुधाकर जोशी व संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फ ेडरेशनचे अध्यक्ष सी.ए. बापुसाहेब टाक यांनी संस्थेच्या प्रगतीचे व पारदर्शक कारभाराचे कौतुक केले.

सभेच्या प्रारंभी संस्थेचे चेअरमन श्री. राणीप्रसाद मुंदडा यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा दिला. व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन व अहवाल वाचन श्री. उमेश शिंदे यांनी केले.



यावेळी चेअरमन श्री. राणीप्रसाद मुंदडा, व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी, डॉ. एन.एस. शेख, श्री. विलास दिघे, डॉ. माणिकराव शेवाळे, श्री. सूर्यकांत शिंदे, श्री. नानासाहेब वर्पे, श्री. दत्तात्रय आरोटे, ड. प्रशांत गुंजाळ, श्री. सूचित गांधी, श्री. सुदीप वाकळे, श्री. उमेश बोटकर, श्री. श्रीकांत कोकणे, श्री. सोमेश्वर दिवटे, सौ. सुलभाताई दिघे, सौ. सुनंदाताई दिघे, श्री. अनिल सातपुते, सी.ए. अमित कलंत्री, व्यवस्थापकीय सल्लागार श्री. प्रकाश गुंजाळ तसेच संचालक मंडळाचे सदस्य, सभासद, मान्यवर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभासदांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि आर्थिक शिस्त यांच्या बळावर संग्राम पतसंस्थेची प्रगतीची घोडदौड यापुढेही अशीच सुरू राहणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# संगमनेरकरांच्या अभिप्रेत असलेलेच छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य स्मारक उभारणार!

## दीड वर्षे खाती हातात असूनही वाढीव जागेचा प्रश्न सोडवला नाही; आता स्मारकाच्या कामात खोडा घालून संगमनेरकरांची दिशाभूल करू नका

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा संगमनेर शहरासाठी केवळ एक विकास प्रकल्प नसून, तो प्रत्येक संगमनेरकराच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि स्वाभिमानाचा विषय आहे. त्यामुळे संगम नेरकरांच्या मनात ज्या स्वरूपाचे स्मारक आहे, त्यांच्या ज्या अपेक्षा आहेत, त्याला पूर्णपणे न्याय देणारे भव्य-दिव्य, दिमाखदार आणि पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे स्मारकच उभारण्यात येईल. स्मारकाच्या उभारणीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि त्यासाठी नगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी स्पष्ट भूमिका माजी नगराध्यक्ष दिलीपशेठ पुंड यांनी व्यक्त केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. महाराजांनी स्वराज्याची स्थापना करताना दिलेला स्वाभिमान, लोककल्याणकारी राज्यकारभार, सर्वधर्मसमभाव, दूरदृष्टी आणि रयतेप्रती असलेली बांधिलकी आजही प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे संगमनेरमध्ये उभारण्यात येणारे महाराजांचे स्मारक हे केवळ पुतळा किंवा वास्तू म्हणून मर्यादित न राहता, महाराजांच्या कर्तृत्वाची आणि विचारांची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणारे केंद्र असावे, अशी संगमनेरकरांची भावना आहे. ही भावना लक्षात घेऊनच नगरपालिकेकडून स्मारकाचे नियोजन करण्यात येत आहे.

स्मारकासाठी आवश्यक असलेल्या वाढीव जागेचा प्रश्न गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित आहे. मात्र या दीड वर्षांच्या काळात परिवहन तसेच नगरविकास खाते आपल्याच ताब्यात असतानाही संबंधितांकडून हा प्रश्न मार्गी का लावण्यात आला नाही, असा सवाल दिलीपशेठ पुंड यांनी उपस्थित केला. शहराच्या विकासाशी थेट संबंधित असणारे नगरविकासासारखे अत्यंत महत्त्वाचे खाते आणि त्यासोबत परिवहन खाते हातात असताना, स्मारकासाठी आवश्यक वाढीव जागेचा विषय शासनस्तरावर सोडवण्यासाठी पुरेसा कालावधी आणि संधी उपलब्ध होती. तरीही हा प्रश्न प्रलंबित राहिला, याचे उत्तर आधी संगमनेरकरांना दिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

गेल्या दीड वर्षात वाढीव जागेसाठी ठोस निर्णय घेता आला नाही आणि आता नगरपालिका छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे प्रत्यक्ष काम पुढे नेण्याचा प्रयत्न करत असताना त्यावर आक्षेप उपस्थित करणे, हा मोठा विरोधाभास आहे. स्मारकाच्या कामाला गती मिळत असताना त्यामध्ये अडथळे निर्माण करण्यापेक्षा किंवा नागरिकांच्या मनामध्ये गैरसमज निर्माण करण्यापेक्षा, स्मारक अधिक भव्य आणि सुंदर कसे होईल यासाठी सर्वांनी एकत्रितपणे सहकार्य करणे आवश्यक आहे, असे पुंड यांनी स्पष्ट केले.

आमदार सत्यजीत तांबे यांनी यापूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी स्पष्ट भूमिका घेतली असून, स्मारकाच्या उभारणीसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. संगमनेरकरांच्या भावनांना न्याय देणारे आणि शहराच्या वैभवात भर घालणारे स्मारक उभारले जावे, यासाठी आवश्यक त्या स्तरावर प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यानंतर नगरपालिकेनेही स्मारकाच्या प्रत्यक्ष उभारणीच्या दृष्टीने आवश्यक नियोजनाला सुरुवात केली आहे. त्यामुळे आता या विषयाला राजकीय वादाचे स्वरूप न देता प्रत्यक्ष कामाला गती मिळणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे.

स्मारकाचे नियोजन करताना केवळ आजचा विचार केला जाणार नाही, तर पुढील अनेक दशकांचा आणि शहराच्या वाढत्या विस्ताराचाही विचार केला जाणार आहे. स्मारकाचा परिसर प्रशस्त, आकर्षक आणि नागरिकांसह शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठीही प्रेरणादायी ठरावा, यासाठी नियोजन केले जाईल. महाराजांच्या स्मारकाची भव्यता, परिसराचे सुशोभीकरण, नागरिकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतुकीचे नियोजन तसेच भविष्यातील गरजा या सर्व बाबींचा एकत्रित विचार करण्याची नगरपालिकेची भूमिका आहे.

वाढीव जागा अधिकृतपणे उपलब्ध झालीच पाहिजे.

अतिरिक्त जागेचा उपयोग स्मारक अधिक भव्य करण्यासाठी, परिसर अधिक प्रशस्त करण्यासाठी तसेच सुशोभीकरण आणि अन्य आवश्यक सुविधांसाठी नियोजनबद्ध पद्धतीने केला जाईल. त्यामुळे वाढीव जागा नगरपालिकेला मिळालीच व ती जागा उपलब्ध करून देण्यासाठी ज्यांच्याकडे संबंधित खाती आणि अधिकार आहेत त्यांनी पुढाकार घ्यावा. मात्र वाढीव जागेचा विषय पुढे करून सध्या सुरू असलेल्या स्मारकाच्या प्रक्रियेला थांबवण्याचा किंवा त्यामध्ये खोडा घालण्याचा प्रयत्न योग्य ठरणार नाही, असेही पुंड यांनी स्पष्ट केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर राजकारण करण्याऐवजी त्यांच्या स्मारकासाठी सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. दीड वर्षे संधी आणि संबंधित खाती हातात असताना वाढीव जागेचा प्रश्न सोडवला गेला नाही आणि आता नगरपालिका प्रत्यक्ष कामाला लागल्यानंतर त्याच मुद्द्यावरून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर संगमनेरकर ते स्वीकारणार नाहीत. संगमनेरची जनता सुज्ञ असून, कोण स्मारकाचे काम पुढे नेण्यासाठी प्रयत्न करत आहे आणि कोण त्यामध्ये अडथळे निर्माण करत आहे, हे नागरिकांना चांगले समजते, असे पुंड म्हणाले.

या विषयामध्ये आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अधिक भव्य, आकर्षक आणि प्रेरणादायी कसे करता येईल, यासाठी प्रत्येकाने आपापल्या स्तरावर योगदान देणे गरजेचे आहे. वाढीव जागा मिळवून देणे शक्य असेल तर त्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करावेत. नगरपालिकाही त्यासाठी आवश्यक ते सहकार्य करेल. मात्र जागेच्या नावाखाली स्मारकाचे प्रत्यक्ष काम रखडता कामा नये, अशी स्पष्ट भूमिका नगरपालिकेची आहे.

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ओळखीचा आणि अभिमानाचा भाग म्हणून हे स्मारक विकसित करण्याचा मानस आहे. भविष्यात संगमनेरमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या स्मारकातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची जाणीव व्हावी आणि प्रत्येक संगमनेरकराला या स्मारकाकडे पाहताना अभिमान वाटावा, या दृष्टीने त्याची उभारणी केली जाईल. स्मारक हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे तर असेलच, परंतु नव्या पिढीला महाराजांचा इतिहास, त्यांचे विचार आणि आदर्श यांची प्रेरणा देणारेही ठरेल.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा पक्षाचा विषय नाही; हा संपूर्ण संगमनेरचा विषय आहे. त्यामुळे त्यात राजकारण न आणता संगमनेरकरांच्या अपेक्षेप्रमाणे सर्वांनी मिळून भव्य-दिव्य स्मारक उभारण्यासाठी योगदान द्यावे. नगरपालिका या कामात कोणतीही कमतरता ठेवणार नाही. वाढीव जागा उपलब्ध झाली तर तिचाही योग्य वापर केला जाईल आणि संगमनेरकरांच्या मनातील स्मारकच प्रत्यक्षात साकारले जाईल, असा विश्वास दिलीपशेठ पुंड यांनी व्यक्त केला.

संगमनेरकरांच्या भावना, शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक लौकिक तसेच पुढील पिढ्यांच्या अपेक्षा लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे हे स्मारक संगमनेरची नवी ओळख आणि प्रत्येक संगम नेरकराचा अभिमान ठरेल, अशाच भव्य स्वरूपात उभारण्यासाठी नगरपालिका पूर्ण क्षमतेने काम करणार असल्याचेही दिलीपशेठ पुंड यांनी स्पष्ट केले.

# निमणबेट शाळेला बढेकर डेव्हलपर्सकडून दोन डिजिटल फलकांची भेट

**मंचर (समर्थ गांवकरी)**

बढेकर डेव्हलपर्स पुणे यांच्या वतीने पारगाव ता.आंबेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमणबेटला सुमारे तीन लाख रुपये किमतीचे दोन डिजिटल फलक प्रदान करण्यात आले.या फलकांचे उद्घाटन रेखाताई प्रविणशेठ बढेकर यांच्या हस्ते करण्यात आले.




आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे.विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष बढेकर, विजय बढेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व माजी विद्यार्थी संघाच्या वतीने प्रविणशेठ बढेकर यांच्याकडे डिजिटल फलकांची मागणी करण्यात आली होती.त्यांनी तत्काळ मागणी मान्य करून दिलेले आश्वासन पूर्ण केले.यापूर्वीही बढेकर यांच्या माध्यमातून शाळेला प्रवेशद्वार मिळाले असल्याचे मुख्याध्यापक रामदास उंडे यांनी सांगितले.रेखाताई बढेकर यांनी हे फलक विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी दीपस्तंभ ठरतील, असे सांगत शाळेच्या गुणवत्तावाढीचे कौतुक केले.डॉ.जयंत नारळीकर अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत खान अकादमीच्या माध्यमातून शाळेने केलेल्या कामगिरीचेही त्यांनी विशेष कौतुक केले.यावेळी विजय वळसे पाटील, बबनराव ढोबळे, किरण ढोबळे, नितीन ढोबळे, श्वेताताई ढोबळे यांनी मनोगते व्यक्त केली. वीरेंद्र ढोबळे, लताताई ढोबळे, रोहिणी देवाडे, प्रियांका ढोबळे, बारकुशेठ ढोबळे, प्रकाश ढोबळे, अनिल पुंडे, किरण ढोबळे, योगेश बढेकर, सुनिता ढोबळे, सुशिला महानुभाव, पोपट लबडे, शांताराम थोरात, नवनाथ ढोबळे, विशाल ढोबळे, दयानंद ढोबळे, धनेश फावडे, विलास भूमकर, संतोष ढोबळे, निखिल दातखिळे, मनिषा ढोबळे तसेच पालक उपस्थित होते.चंद्रप्रभा अरगडे, गणेश ढोबळे, अशोक ढोबळे, अमोल ढोबळे, किशोर ढोबळे, शरद दातखिळे, स्वप्निल ढोबळे, आरती ढोबळे, पूजा ढोबळे, रेखा कुलकर्णी, निकिता फावडे, काजल ढोबळे, कावेरी ढोबळे, प्रणाली ढोबळे यांनी नियोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना रेखाताई प्रविणशेठ बढेकर यांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे संच देण्यात आले. सूत्रसंचालन मुख्याध्यापक रामदास उंडे यांनी तर आभार मनोहर ढोबळे यांनी मानले.

# रक्षाबंधन सण भारतीय संस्कृतीन जगाला दिलेली देण : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

## बंधूत्वाचा संदेश देणारा सण रक्षाबंधन

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

रक्षाबंधन हा प्रेमाचा संदेश देणारा सण संपूर्ण देशामध्ये मोठ्या आनंदाने साजरा होत आहे. बहिण भावाच्या निस्वार्थी प्रेमाचा हा सण भारतीय संस्कृतीतला अत्यंत महत्वाचा सण आहे. भाऊ बहिणीच्या अतुट प्रेमाच एक बंधन त्यामध्ये आहे. रक्षाबंधन सण भारतीय संस्कृतीन जगाला दिलेली देण असून बंधूत्वाचा संदेश देणारा सण असल्याचे गौरवदगार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा.शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

रक्षाबंधनानिमित्त नगराध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे यांच्या निवासस्थानी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी रक्षाबंधन केले. याप्रसंगी मा.आ.डॉ. सुधीर तांबे, शरद नाना थोरात आदींसह विविध पदाधिकारी व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



याप्रसंगी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतीय संस्कृतीमध्ये मोठी विविधता आहे. विविध परंपरा सण मोठ्या आनंदाने आपण साजरे करतो. यामध्ये भाऊ बहिणीच्या पवित्र नात्याचा आणि निस्वार्थी प्रेमाचा संदेश जगाला देणारा हा आदर्शवत असा सण आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांना व्यापक संधी देण्यासाठी क्रीडा प्रबोधिनी उभारणार : विवेक वळसे पाटील

**मंचर (समर्थ गांवकरी)**

शिक्षणासोबत कला, क्रीडा, विज्ञान व स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला पाहिजे. गुणवंत विद्यार्थ्यांना व्यापक संधी देण्यासाठी पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याचा मानस असल्याचे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी सांगितले.

आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची ७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे सभापती कान्होबा महादेव डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली घोडेगाव ता.आंबेगाव येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, पंचायत समितीचे सभापती कैलासबुवा काळे, सचिन भोर, गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका, उपसभापती सोपान सैद, खजिनदार बाळासाहेब साबळे, मानद सचिव सखाराम मुंजाळ, संचालक भास्कर चासकर, संजय कंगले, संतोष लबडे, दत्तात्रय मेचकर, अभिजीत नाटे, बाबाजी गाढवे, शंकर गवारी, बाळासाहेब सैद, विकास बाणखेले, मिनाक्षी वळसे पाटील, संतोष पोखरकर, सुरेखा तोडकर, मंगेश जावळे, सीमा कहडणे, अनिता सिनलकर, मंदाकिनी उगले यांच्यासह शिक्षक, सभासद, विद्यार्थी, पालक व मान्यवर उपस्थित होते.सभेत सेवानिवृत्त शिक्षक, गुणवंत विद्यार्थी, शाळा, मुख्याध्यापक व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. संस्थेने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत १० वर्षाकरिता ३ कोटी रूपयांचे बॉण्ड खरेदी केले आहे. मानद सचिव सखाराम मुंजाळ यांनी विविध योजनांची माहिती दिली. सूत्रसंचालन सुनिल भेके व तुषार शिंदे यांनी केले.

## ३० ऑगस्ट रविवारी जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

आपले आरोग्य... आमची जबाबदारी या संकल्पनेतून स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अहिल्यानगर, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल्स आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात मोफत सुविधा –

सर्वसाधारण आरोग्य सल्ला, महिला आरोग्य तज्ञांचे मार्गदर्शन, रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी, ईसीजी तपासणी, एक्स-रे तपासणी, रक्त तपासणी, आरोग्य समुपदेशन व सर्वसाधारण औषधे मोफत मिळतील.

या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा.असे आवाहन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी श्री. नीरज चांगटे मो.नं.८३२९०६५६२९ यांच्याशी संपर्क साधावा.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५० ई-बसेसचे लोकार्पण

**नाशिक (समर्थ गांवकरी)**

नाशिक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत ५० ई-बसेसचे नाशिककरांच्या सेवेत दाखल होत आहेत. या बसेसच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नाशिक शहरासाठी दाखल झालेल्या ५० ई-बसेसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री गिरीष महाजन, महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत नाशिक शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ मीटर लांबीच्या ५० ई-बसेस शहरात दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आधुनिक ई-बसेसचा समावेश झाल्यामुळे नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासही हातभार लागणार आहे.



डिझेल बसेसच्या तुलनेत ई-बसेसच्या वापरामुळे परिचालन खर्चातही बचत होणार आहे. नाशिक शहराचा विकास आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यात आणखी बसेस उपलब्ध होणार असून त्यातून नागरिकांना अधिक व्यापक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# अखंड हरिनाम सप्ताह व एकादश अतिरुद्र महायज्ञाच्या आयोजनाची तयारी सुरू

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अखंड हरिनाम सप्ताह व एकादश अतिरुद्र महायज्ञाच्या आयोजनासंदर्भातील नियोजन बैठक जगतगुरू द्वाराचार्य डॉ.राम कृष्णदास महाराज लहवितकर, ह.भ.प. विवेक महाराज केदार, ह.भ.प. रोहित महाराज राक्षे आणि ह.भ.प. सोमनाथ महाराज थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी ९ डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२६ या कालावधीत भव्य-दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले. या सप्ताहाच्या माध्यमातून भाविकांना विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी मिळणार आहे.

सप्ताहाच्या काळात दररोज सकाळी ७ ते ९या वेळेत विविध पारायणांचे आयोजन करण्यात येणार असून, यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण, भागवत पारायण तसेच अन्य पारायणांचा समावेश राहणार आहे. सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. दुपारच्या सत्रात संत-महंतांची प्रवचने, व्याख्याने, कथा तसेच विविध आध्यात्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

सायंकाळी ६ ते ९ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे या नाम सप्ताहाला भक्ती, ज्ञान आणि अध्यात्माची अनोखी सांगड लाभणार आहे.

तसेच दि.११ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२६ या कालावधीत एकादश अतिरुद्र महायज्ञाचे आयोजन करण्यात येणार आहे. या महायज्ञाची पूर्णाहुती चंपाषष्ठीच्या पर्वकाळावर १५ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे.



सप्ताहाच्या संपूर्ण कालावधीत भाविकांसाठी सकाळी व सायंकाळी अशा दोन वेळा अन्नदान व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

या भव्य धार्मिक सोहळ्यासाठी स्वामी समर्थ केंद्राचे गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, संत जंगलीदास महाराज, संत शांतिगिरीजी महाराज तसेच अनेक साधुसंतांना निमंत्रित करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला.

अशा या पवित्र व पर्वणीच्या समयी भव्य-दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व एकादश अतिरुद्र महायज्ञ भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात पार पाडण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.

या नियोजन बैठकीस खंडेश्वर देवस्थानचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त मंडळ, गावातील सर्व बंधू-भगिनी, विविध पदाधिकारी, मित्रमंडळांचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यायिक सेवा पूर्व प्रशिक्षणासाठी वकिलीचा अनुभव ३ वर्षांवरून १ वर्ष

## सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ च्या ऑनलाइन अर्जात सुधारणा

**पुणे (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विधी/न्यायिक सेवा परीक्षा (JMFC d CJJD) पूर्व प्रशिक्षण योजनेच्या पात्रतेत महत्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हिल) क्र. १११०/२०२५ च्या संदर्भात दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर (उगगऊ) परीक्षेसाठी आवश्यक असलेला वकिलीचा अनुभव (ड्रु तीन वर्षांवरून एक वर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाच्या अनुषंगाने सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ च्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विधी/न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेसाठी असलेली तीन वर्षांच्या वकिली अनुभवाची अट बदलून एक वर्ष करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने वर्ष २०२६-२७ करिता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ करिता ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक ९ ऑगस्ट २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे.

टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या संस्थांच्या लक्षित गटातील पात्र व इच्छुक उमेदवारांनी सुधारित पात्रता निकषाची नोंद घेऊन त्यानुसार ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन निलेश सागर (भा.प्र.से.), अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण अंमलबजावणी व समन्वय समिती तथा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (आसंप्रसं), पुणे यांनी केले आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# थोडक्यात पण महत्त्वाचे

## ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांना 'तो राजहंस एक...' सांगितिक कार्यक्रमातून हृद्य मानवंदना

**सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २ सप्टेंबर रोजी**

मुंबई (समर्थ गांवकरी)

ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांच्या स्म तीदिनानीमित्त त्यांच्या संगीतसाधनेला आणि मराठी संगीतविश्वातील अमूल्य योगदानाला अभिवादन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने 'तो राजहंस एक...' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवार, २ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे होणार आहे.

ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांनी मराठी भावसंगीताला स्वतंत्र ओळख आणि समृद्ध आशय प्राप्त करून देण्यात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या संगीतबद्ध केलेल्या अजरामर गीतांमधून भाव, शब्द आणि सुरांचा अनोखा संगम अनुभवायला मिळतो. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या संगीतसंपदेला मानवंदना देणारा हा विशेष कार्यक्रम रसिकांसाठी आयोजित करण्यात आला आहे.

## सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषात धामणीत खंडोबा-बाणाईचा विवाह सोहळा



मंचर (समर्थ गांवकरी)

मंचर प्रतिनिधीआंबेगाव तालुक्यातील धामणी येथील खंडोबा देवस्थान मंदिराच्या प्रांगणात श्रावण पौर्णिमेनिमि त्त खंडोबा-बाणाईचा शाही विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात पार पडला. सनई, तुतारी व ढोलाच्या निनादात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. पहाटे मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाचा अकरा जोडप्यांच्या हस्ते रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर आरती झाली. सेवेकरी व महिला भाविकांनी सप्तशिवलिंग तसेच खंडोबा-बाणाईच्या पंचधातूच्या मुखवट्यांना चंदनउटीचा लेप लावून सुगंधी दवणाच्या अत्तरात मिसळलेली हळद लावली. विवाह सोहळ्यासाठी मंदिराच्या गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. खंडोबा व बाणाईच्या मुखवट्यांना बाशिंग-मुंडावळ्या बांधून वस्त्रालंकार करण्यात आले. सकाळी सहा वाजता बाणाईचा मुखवटा वाजतगाजत विवाह मंडपात आणण्यात आला. महिलांनी खंडोबाच्या मुखवट्याचे औक्षण करून स्वागत केले.मंगलाष्टकांनंतर फुलांच्या पाकळ्या, अक्षता व भंडाऱ्याची उधळण करत फटाक्यांच्या आतषबाजीत विवाह सोहळा संपन्न झाला. पौरोहित्य प्रमोद देखणे, पोपट भोजने, गणपत भोजने, गणेश जारकर व भाऊ भोजने यांनी केले. दरम्यान, मंदिराच्या दोन्ही महाद्वारांच्या बाजूला दगडी दीपमाळ उभारण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. चंपाषष्ठीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचा मानस सेवेकरी व ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## वृक्षांना राखी बांधत मालदाड गावात अनोखे रक्षाबंधन साजरे



संगमनेर (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील डोंगरदऱ्या व निसर्गाने नटलेल्या मालदड गावात यावर्षी महिलांनी झाडांना राखी बांधत अनोख्या पद्धतीने पर्यावरण पूरक असे रक्षाबंधन साजरे केले आहे.

मालदाड येथील चैतन्य श्री कानिफनाथ महाराज देवस्थान इनाम परिसरात झाडांना राखी बांधून महिलांनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले आहे. रक्षाबंधन म्हणजे प्रेम ,आपुलकी आणि रक्षणाच्या भावनेचे प्रतीक असा सण आहे. याच भावनेला निसर्ग संवर्धनाची जोड देत यावर्षीचा रक्षाबंधनाचा सण महिलांनी निसर्गाच्या सानिध्यात साजरा केला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली मालदड गावात विविध विकासकामे झाली असून मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड ही करण्यात आली आहे. त्यामुळे मालदड गाव आज हिरवाईने नटलेली आहे.

वृक्ष हे आपले खऱ्या अर्थाने निस्वार्थी मित्र आहे. ते आपल्याला सावली, फळे ,फुले व जीवनावश्यक ऑक्सिजन देतात. वसुंधरेचे संवर्धन व संरक्षण करणे ही प्रत्येकाचीच नैतिक जबाबदारी असून त्याचे सर्वांनी पालन केले पाहिजे. वृक्षांप्रती कृतज्ञेची भावना म्हणून आज महिलांनी झाडांना राखी बांधत रक्षाबंधन साजरे केले आहे. पर्यावरण पूरक असा हा उपक्रम असून याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उपक्रमाचे लोकनेते बाळासाहेब थोरात , माजी आ. डॉ. सुधीर तांबे , सौ दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे , डॉ. जयश्रीताई थोरात यांनी अभिनंदन केले आहे

# धार्मिक स्थळांचा विकास करणे समाजातील प्रत्येकाची जबाबदारी : युवा नेते मंगेश दाते

## सुनीताताई सोबले यांच्या योगदानातून आरसीसी प्रवेशद्वार; सभामंडपासाठी २५ लाखांचा निधी

पारनेर (समर्थ गांवकरी)

धार्मिक स्थळे ही समाजाला एकत्र आणणारी आणि सामाजिक एकोपा वाढविणारी केंद्रे आहेत. धार्मिक कार्यक्रम ंच्या माध्यमातून समाजामध्ये एकत्र येण्याची, सकारात्मक विचार करण्याची आणि नव्या उपक्रमांना ऊर्जा मिळते. त्यामुळे धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण व विकास करणे ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते तथा उद्योजक मंगेश दाते यांनी केले.

पारनेर शहराजवळील श्री संत सागरदास महाराज समाधी मंदिरात गुरुवार दि. २७ ऑगस्ट रोजी श्रावणी भंडारा उत्सव, प्रवेशद्वार भूमिपूजन आणि जाहिर हरिकीर्तनाचा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांच्या सौजन्याने मंदिरासाठी आरसीसी प्रवेशद्वार उभारण्यात येणार असून, त्याचे भूमिपूजन सुनीताताई सोबले व युवा नेते मंगेश दाते यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी ह.भ.प. संजय महाराज घोडके यांच्या जाहिर हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या कीर्तनातून संत परंपरा, अध्यात्म आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला. ह.भ.प. सचिन महाराज शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक कार्यक्रम पार पडला.

यावेळी उद्योजक प्रीतम सगणे, राष्ट्रवादी काँग्रेस पारनेर शहराध्यक्ष राजू औटी, सचिन शेरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष सुनील गाडगे, विठ्ठल कावरे, ह.भ.प. सचिन महाराज शेटे,बबनराव चौरे, अनिल वैद्य सर, सतीश वैद्य, गोपीनाथ म्हस्के, बाळू सोनवणे, राजू वैद्य, अनिता शेरकर, कविता वैद्य, स्वाती वैद्य, उज्वला विधाटे, छाया वैद्य, जयश्री शेरकर, राणीताई सोबले, सारिका सोनवणे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंगेश दाते म्हणाले, धार्मिक स्थळांचा विकास हा केवळ वास्तूचा विकास नसून त्यातून समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि एकजूट जपली जाते. संत सागरदास महाराज मंदिर परिसराच्या विकासासाठी समाजातील विविध घटक पुढे येत असून ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. मंदिरासाठी सगणे परिवाराने जागा उपलब्ध करून दिली असून, सुनीताताई सोबले यांनी मंदिराच्या प्रवेशद्वारासाठी पुढाकार घेतला आहे. समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा प्रकारे पुढे येणे ही सामाजिक बांधिलकीची भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

### सुनीताताई सोबले यांचा मंदिर विकासासाठी पुढाकार

सोबलेवाडीच्या कन्या असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांनी संत सागरदास महाराज मंदिराच्या विकासासाठी आरसीसी प्रवेशद्वार देण्याचा संकल्प केला आहे. मंदिराच्या प्रति असलेली श्रद्धा आणि भावनिक नाते लक्षात घेऊन त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. त्यांच्या या योगदानामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडणार असून भाविकांसाठी मंदिराची स्वतंत्र ओळख निर्माण होण्यास मदत होणार आहे. तसेच मंदिर परिसरात इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासही प्रयत्न करणार आहेत.



### २५ लाख रुपयांचा सभामंडप मंजूर

पारनेर शहराजवळील संत सागरदास महाराज मंदिरासाठी आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून २५ लाख रुपयांचा सभामंडप मंजूर करण्यात आला आहे. त्याची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच सभामंडपाचे काम प्रत्यक्षात सुरू होईल. आगामी काळातही समाजाच्या विविध प्रश्नांवर काम करून विकासाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्यास कटिबद्ध असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस युवा नेते मंगेश दाते यांनी सांगितले. सभामंडपासाठी सामजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांनी पाठपुरावा केला आहे.

# नगर शहरात मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त डॉ. सुजय विखे पाटील यांचा फोटो; सुजय विखे पाटील म्हणाले

**विशिष्ट समाजाने नाकारले तेव्हा कोणी विचारले नाही; फलकाशी संबंध नाही : सुजय विखे पाटील**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

लोकसभा निवडणुकीत एका विशिष्ट समाजाने नाकारले तेव्हा कोणी विचारायला आले नाही, असे सांगत आता कोणी समर्थन देत असेल तर त्यांनीच विचारावे, अशी प्रतिक्रिया माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

अहिल्यानगर शहरात मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त मुस्लीम समाजाच्या वतीने मिरवणूक मार्गावर लावण्यात आलेल्या फलकावर डॉ. सुजय विखे पाटील यांचा फोटो असल्याने चर्चा सुरू झाली होती. याबाबत गुरुवारी त्यांनी माध्यमांशी बोलताना भूमिका स्पष्ट केली.

विखे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीतील सर्व घटक पक्ष जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबद्ध आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागत आहेत. आपण जात-धर्म विरहित राजकारण करतो. अशा पद्धतीने विभाजन करणे चुकीचे आहे.

लोकसभेला एका विशिष्ट समाजाने नाकारले तेव्हा त्यांना



विचारायला कोणी गेले नाही आणि आपल्यालाही कोणी विचारायला आले नाही. आता कोणी समर्थन देत असेल तर त्यांना फलक लावावा वाटला असेल, त्यांनाच विचारले पाहिजे. या प्रक्रियेशी आपला काहीही संबंध नाही.

अहिल्यानगरच्या विकासावर भर असल्याचे सांगत त्यांनी विषयाचा वाद करून विभाजन करू नये, असे आवाहन केले. नाकारले तेव्हाही दुःख झाले नाही आणि आता कोणी स्वीकारत असेल तर त्याचा आनंद नाही, असेही ते म्हणाले.

# आमदार विक्रम पाचपुते यांचा 'सुपरफास्ट' शाळा दौरा

## २९ ऑगस्टला १५ जिल्हा परिषद शाळांची पाहणी

**सकाळी ९ ते दुपारी १२.४५ पर्यंत प्रत्येक शाळेत १५ मिनिटांचा मायक्रो प्लॅन**

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते हे २९ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा शहरातील सर्व १५ जिल्हा परिषद प्राथमि क शाळांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. या दौऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक शाळेच्या पाहणीसाठी अवघ्या १५ मिनिटांचा वेळ निश्चित करण्यात आला असून, सकाळी ९ वाजता सुरू होणारा हा झंझावाती दौरा दुपारी १२.४५ वाजेपर्यंत पूर्ण होणार आहे.

एकाच दिवशी सर्व शाळांना भेट देण्यासाठी आमदार पाचपुते यांनी वेळेचे काटेकोर नियोजन केले आहे. या दौऱ्यात ते विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची तपासणी, वर्गखोल्यांची पाहणी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांची उपलब्धता तसेच इतर मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. याशिवाय प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांकडून तातडीच्या अडचणींबाबत निवेदनही स्वीकारले जाणार आहे.

अल्पावधीत सर्व शाळांची पाहणी करण्याच्या या मायक्रो प्लॅनिंगमुळे शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासनाची चांगलीच लगबग वाढली आहे. दरम्यान, शाळांच्या प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या तत्पर उपक्रमाचे नागरिकांकडूनही स्वागत करण्यात येत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात २५२५ शिक्षकांची पदे रिक्त; १ सप्टेंबरपासून खासदार लंकेंचे उपोषण

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील २५२५ शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याच्या मागणीसाठी खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न दिल्यास १ सप्टेंबरपासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



खा. लंके यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना पत्र दिले आहे. त्यात म्हटले आहे की, प्राथमिक व पदवीधर संवर्गातील ४७१ आणि माध्यमिक विभागातील २०५४ अशी एकूण २५२५ पदे रिक्त आहेत. प्रत्येकी २० विद्यार्थी गृहीत धरल्यास ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे.

रिक्त पदांमुळे कार्यरत शिक्षकांवर बीएलओ ड्युटी, जनगणना, विविध सर्वेक्षणे, ऑनलाइन पोर्टल, आधार-बँक खाती, पोषण आहार, एफएसएसएआय नोंदणी यांसारख्या अशैक्षणिक कामांचा अतिरिक्त भार पडत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे.

शिक्षकांचा अध्यापनाचा वेळ अशा कामांत जात असल्याने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हा प्रश्न केवळ कर्मचारी भरतीचा नसून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्व रिक्त पदांचा शाळानिहाय, विषयानिहाय कृती आराखडा जाहीर करावा, शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करावे, पर्यायी प्रशासकीय व्यवस्था करावी आणि कमतरता असलेल्या शाळांत तात्पुरती शिक्षक व्यवस्था करावी, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.

३१ ऑगस्टपर्यंत निर्णय झाल्यास १ सप्टेंबरपासून उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक शिक्षक मिळाला पाहिजे, प्रत्येक शिक्षकाला अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदार असलेल्या प्रशासनाची उत्तरदायित्व निश्चित झाले पाहिजे, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली आहे.

# भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- **रक्तदान हेच खरे जीवनदान : डॉ.विलास मढीकर**
- **सामाजिक बांधिलकी जपत जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचा उपक्रम**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्यात जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानने पुढाकार घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन केले ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक बांधिलकी जपत प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले आहे. रक्तदान हेच खरे जीवनदान आहे. रक्तदानाच्या महान कार्यात सहभागी होऊन एक चांगला पायंडा जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानने पाडला आहे,असे प्रतिपादन जनकल्याण रक्तकेंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर यांनी केले.

जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान (ट्रस्ट) आणि सकल हिंदू स्वकुळ साळी समाजाच्या वतीने भगवान श्री



जिव्हेश्वर जन्मोत्सवाचे औचित्य साधून जनकल्याण रक्तपेढी, नालेगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण डफळ म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपण केलेल्या रक्तदानामुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात. भगवान श्री जिव्हेश्वरांच्या जन्मोत्सवानिमि त्त सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेले हे शिबिर समाजासाठी प्रेरणादायी आहे.तरुणांनी दाखविलेला उत्साह कौतुकास्पद आहे.

# राखीच्या धाग्यातून बालविवाहमुक्तीचा संकल्प; एक हजार विद्यार्थ्यांनी दिले वचन

## स्नेहालय उडान प्रकल्पाचा' सुरक्षा बंध' उपक्रम मी बालविवाह करणार नाही, बहिणाचाही होऊ देणार नाही

पारनेर (समर्थ गांवकरी)

रक्षाबंधनाच्या निमित्ताने बहिणीच्या संरक्षणाचा अर्थ अधिक व्यापक करत अ.ए. सोसायटीच्या सेनापती बापट विद्यालयात स्नेहालय संचलित उडान प्रकल्पाच्या वतीने 'सुरक्षा बंध' अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी बालविवाहाला विरोध करण्याची शपथ घेत सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.यावेळी उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम, विद्यालयाचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार, युवा फोरमचे विकास सुतार, रेडिओ नगरच्या आर.जे. ऋतुजा, सामाजिक कार्यकर्त्या नेहा धिवरे, पत्रकार भगवान गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रवीण कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, रक्षाबंधनाच्या दिवशी भाऊ बहिणीच्या संरक्षणाचे वचन देतो. मात्र, बहिणीचे खरे संरक्षण म्हणजे केवळ संकटाच्या वेळी तिच्या पाठीशी उभे राहणे नव्हे; तर तिचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी साथ देणे, तिचा बालविवाह होऊ न देणे, तिच्या स्वप्नांचा आणि निर्णयांचा आदर करणे होय. हाच संदेश 'सुरक्षा बंध' अभियानातून देण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी, मी बालविवाह करणार नाही आणि माझ्या बहिणीचा बालविवाह होऊ देणार नाही. मी १८ वर्षांखालील मुलीशी विवाह करणार नाही. माझ्या आजूबाजूला बालविवाह होत असल्यास त्याला विरोध करीन, अशी सामूहिक शपथ घेतली.

बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहते, आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, आर्थिक स्वावलंबनाच्या संधी कमी होतात आणि स्वतःच्या आयुष्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मर्यादित होतो. त्यामुळे बालविवाह रोखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून कुटुंब, विद्यार्थी, युवक आणि समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

स्नेहालयच्या उडान प्रकल्पामार्फत अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्याचे मिशन राबविण्यात येत असून, त्यात युवक व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे. 'सुरक्षा बंध'च्या माध्यमातून बालविवाहविरोधी संदेश घराघरांत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

राखी बांधली हातावर; बालविवाह रोखण्याची



जबाबदारी घेतली मनावर! या घोषवाक्यातून विद्यार्थ्यांनी बालविवाहमुक्त समाजनिर्मितीचा निर्धार व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### पोलीस स्टेशन आवारातील स्टॅम्प व्हेंडर आता सब रजिस्टर कार्यालयात

**नागरिकांची गैरसोय दूर होणार**



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या आवारात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले मुद्रांक विक्रेते (स्टॅम्प व्हेंडर) आता दुय्यम निबंधक (सब रजिस्टर) कार्यालयाच्या परिसरात स्थलांतरित करण्यात आले आहेत. दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळणे आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक जलद व सुलभ करणे, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत तहसीलदार सचिन डोंगरे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे आणि दुय्यम निबंधक गोरख तारगे यांनी चर्चा करून स्थलांतराचा निर्णय अमलात आणला. तहसीलदारांच्या पुढाकारातून ही नवीन व्यवस्था २७ ऑगस्ट २०२६ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे.

यापुढे दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक असलेले स्टॅम्प पेपर त्याच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने वेळ आणि श्रमाची बचत होणार आहे. त्यामुळे नागरिकांसह वकील मंडळींनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

पोलीस स्टेशनतर्फे निरोप समारंभ

श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या आवारात अनेक वर्षे सेवा देणारे मुद्रांक विक्रेते मिलिंद कुलकर्णी, अर्जुन मडके आणि भारत सूर्यवंशी यांचा पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मान करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.

### ई-स्पोर्ट्स गेम्स फेडरेशनच्या अध्यक्षपदी माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

ई-स्पोर्ट्स गेम्स फेडरेशन (ESGF) च्या अध्यक्षपदाची धुरा इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री तथा सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी स्वीकारली. देशातील २२ राज्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थिती झालेल्या फ डरेशनच्या सर्वसाधारण बैठकीत ड शेलार यांची निवड करण्यात आली.

माहिती तंत्रज्ञान मंत्री ड . आशिष शेलार म्हणले ई-स्पोर्ट्स क्षेत्राला अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि व्यावसायिक स्वरूप मिळावे, त्यातून आर्थिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होऊ शकेल व आपल्या देशात रोजगार उपलब्ध होऊ शकेल. युवा पिढीतील डिजिटल कौशल्यांना व्यासपीठ देतानाच ई-स्पोर्ट्सला केवळ मनोरंजन किंवा गेमिंग न मानता कौशल्य, शिस्त, प्रशिक्षण आणि करिअरची संधी असलेले क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे आव्हान स्विकारुन तरुणांसाठी काम करु, मैदानी खेळाप्रमाणे ई स्पोर्ट्स मध्ये ही प्राविण्य असलेले खेळाडू तयार करु त्यासाठी विविध राज्यांच्या फेडरेशनशी समन्वय साधून केंद्र सरकारशी आवश्यक तो संवाद साधू असेही नवनियुक्त अध्यक्ष शेलार यांनी सांगितले.

ESGF ही आपल्या देशातील ई-स्पोर्ट्सच्या विकासासाठी कार्यरत महत्त्वाची संस्था असून या क्षेत्रात झपाट्याने होणारी वाढ पाहता यातील नव्या संधी तरुणांना उपलब्ध करून देण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे.आपल्या देशात ई-स्पोर्ट्स आणि गेमिंग क्षेत्राचा विस्तार प्रचंड वेगाने होत आहे. भारतात सुमारे ५२ कोटी गेमर्स असून दिवसाला ११ कोटी खेळाडू खेळतात आपल्या देशात २८ या खेळांच्या टूर्नामेंट होतात. हे गेम पाहणाऱ्यांची संख्या सुमारे ८ ते ९ कोटी एवढी आहे. पारंपरिक क्रिकेट, फुटबॉल किंवा हॉकीमध्ये जसे राष्ट्रीय संघ, निवड प्रक्रिया, स्पर्धा, प्रशिक्षण, नियम आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधित्वाची व्यवस्था असते, त्याच धर्तीवर ई-स्पोर्ट्समध्येही एक संरचित व्यवस्था उभारण्याचे काम हे फेडरेशन करते.

### पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीच्या माध्यमातून १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

पवित्र पोर्टलमार्फत राबविण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत मुलाखतीशिवाय या प्रकारात निवडीसाठी एकूण १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या भावी शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, आदिवासी विकास विभागाच्या शासकीय शाळा, महानगरपालिका/ नगरपालिका, शासकीय विद्यानिकेतन तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक पदभरतीसाठी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (ढखढ-२०२५) आयोजित करण्यात आली होती. या प्रक्रियेअंतर्गत मुलाखतीशिवाय निवड प्रकारातील गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली असून विविध व्यवस्थापनांमधील एकूण १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, गुणवत्तेच्या आधारे पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित प्रक्रियेतून निवड झालेल्या या उमेदवारांवर विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

# महिलांच्या सुरक्षेबाबत तडजोड नाही; डॉ. सुजय विखे पाटील यांची ठाम भूमिका

## राहाता नगर परिषदेत रक्षाबंधन सोहळा उत्साहात; महिला कर्मचाऱ्यांनी बांधली राखी









**राहाता (समर्थ गांवकरी)**

महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. महिलांविरोधात गैरप्रकार करणाऱ्या प्रवृत्तींना कायद्याच्या चौकटीत कठोरपणे सामोरे जाऊ, अशी ठाम भूमिका माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली.

राहाता नगर परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्षाबंधन सोहळ्यात डॉ. सुजय विखे पाटील सहभागी झाले. यावेळी नगरसेविका, नगर परिषदेमधील महिला अधिकारी कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी तसेच शहरातील भगिनींनी डॉ. विखे पाटील यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

या वेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना डॉ. विखे पाटील यांनी महिलांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा उल्लेख केला. नगरसेविकेपासून रस्त्यावर स्वच्छता करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांपर्यंत प्रत्येक भगिनीला माझ्यात तिचा भाऊ किंवा कुटुंबातील व्यक्ती दिसते, ही माझ्यासाठी मोठी समाधानाची बाब आहे. सर्वसामान्य महिलांच्या मनात 'आपण हक्काने दादांकडे जाऊ शकतो' हा विश्वास निर्माण होणे, हीच माझ्या कार्याची खरी उपलब्धी आहे,असे ते म्हणाले.

महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट करताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. महिलांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला पाठीशी घातले जाणार नाही. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, अतिक्रमण हटविणे अथवा अनधिकृत बांधकामांवरील कारवाईबाबत काहींकडून टीका करण्यात आली. मात्र, महिलांच्या सुरक्षेचा आणि सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असेल, तर दबावाला बळी न पडता कायद्याच्या चौकटीत निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



रक्षाबंधनाच्या निमित्ताने महिला कर्मचाऱ्यांनी डॉ. विखे पाटील यांना राखी बांधली. यावेळी महिलांशी त्यांनी मनमोकळा संवाद साधला. त्यामुळे राहाता नगर परिषदेत पार पडलेल्या या सोहळ्याला भाऊ-बहिणीच्या नात्याचा जिव्हाळा लाभला. महिलांच्या सुरक्षेबरोबरच त्यांच्या सन्मानासाठी आणि अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा विश्वास या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.

# जनता कन्या विद्यालयात शालेय साहित्य वाटप

## काष्टीतील मुस्लिम बांधवांचा स्तुत्य उपक्रम

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रयत शिक्षण संस्थेचे जनता कन्या विद्यालय ज्युनिअर कॉलेज मध्ये महंमद पैगंबर जयंतीनिमित्त गावातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येवून कन्या विद्यालयातील विद्यार्थीनींना संपूर्ण शालेय साहित्य वाटप करून समाजापुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केल्याने त्यांची मोठी चर्चा सुरू झाली आहे.

दि.२७ रोजी तालुक्यातील काष्टीतील रयतेच्या कन्या विद्यालयात सकाळी १० वाजता गावातील सर्व मुस्लिम बांधवांनी एकत्र येवून शाळेतील आर्थिकदृष्ट्या गरिब होतकरू अनाथ व हुशार विद्यार्थीनींना वही,पुस्तक, पेन,स्कुल बॅग, असे वर्षभर लागणारे संपूर्ण शालेय साहित्य मान्यवरांच्या हस्ते वाटप केले आहे.

हा कार्यक्रम तालुक्याचे माजी सभापती अरुणराव पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमाला परिक्रमा संकुलाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाचपुते, माजी सभापती अरुणराव पाचपुते,सहकार महर्षी काष्टी संस्थेचे अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते,संजय काळे,सुनिल पाचपुते,गंगाराम कोकाटे,अनील पाचपुते

सुदर्शन पाचपुते यांच्यासह मान्यवर पदाधिकारी हजर होते. यावेळी बोलताना माजी सभापती पाचपुते म्हणाले देशात आणि राज्यात जाती,धर्माचे राजकारण सुरु आहे. प्रत्येक समाजात धर्माच्या नावाखाली सामाजिक तेढ निर्माण केला जात आहे. परंतु याला अपवाद आमचे गाव आहे. कोणी कोणत्याही पक्षात असलेतरी गावात हिंदूमुस्लिम बांधवं आम्ही एकोप्याने रहातो वागतो. गावात सालाबाद प्रमाणे यात्रा उत्सव भरतो तेव्हा सर्व मुस्लिम बांधव एकत्र येऊन सहभागी होतात.आणि त्यांच्याही सर्व ईद, मोहरम,महंमद पैगंबर जयंतीनिमित्त आम्ही सहभागी होतो. गावातील सामाजिक कार्यात मुस्लिम बांधवांचे मोठे योगदान आहे.दरवर्षी ते पैगंबर जयंतीनिमित्त वेगवेगळे उपक्रम राबवून समाजाप्रती योगदान देतात त्यांचा आदर्श इतर समाजांनी सुध्दा घेतला पाहिजे असे पाचपुते म्हणाले. आदर्श शिक्षक जमीर शेख यांनी महंमद पैगंबर जयंतीनिमित्त त्यांचा संपूर्ण जीवनपट विद्यार्थ्यांना सांगितला.यावेळी कार्यक्रमाला हाजी मेहबूबभाई शेख,गुलाबभाई तांबोळी,सलाउद्दीनभाई शेख,शफीभाई मणियार ,रफीकभाई इनामदार,गणीभाई जकाते,इरफान बागवान,अकबर बागवान,वसीम बागवान,इकबाल बागवान,हारुन पठाण,जलील शेख,साहिल शेख,महेबुब शेख यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव हजर होते. शेवटी रफिक शेख यांनी सुत्रसंचालन करुण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंगल जोगदंड यांनी सर्वाचे आभार मानले.

## पोलिसांच्या सतर्कतेने वाचले महिलेचे प्राण

**ओतूर (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील सांगणोरे येथील साबळेवाडी येथे एका महिलेने घरगुती कारणातून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती डायल ११२ वरून ओतूर पोलिसांना मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत महिलेचे प्राण वाचविले असल्याची माहिती ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली.

रेश्मा लक्ष्मण साबळे यांनी घरगुती कारणातून फाशी घेण्याचा प्रयत्न केल्याची माहिती डायल ११२ वर प्राप्त झाली. या कॉलची तातडीने दखल घेत ओतूर पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार जनार्दन सापटे व महिला पोलिस शिपाई संगीता दिघे यांनी विलंब न करता सांगणोरे येथील साबळेवाडी गाठली.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तत्काळ रुग्णवाहिकेला पाचारण केले. त्यानंतर संबंधित महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी महिलेची प्रकृती सध्या ठीक असल्याचे सांगितले.

डायल ११२ वरून आलेल्या कॉलची तातडीने दखल घेत सापटे व दिघे यांनी दाखविलेली तत्परता, प्रसंगावधान व धाडस यामुळे एका महिलेचे प्राण वाचण्यास मदत झाली. संकटाच्या प्रसंगी पोलिसांनी दाखविलेल्या मानवतावादी दृष्टिकोनाचे स्थानिक नागरिकांनी कौतुक केले असून, त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## नवीन कार्यालयाच्या शुभारंभानिमित्त अमोल शिर्के यांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या कडून सत्कार!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले-संगमनेर टाइम्सचे या यूट्यूब चैनल चे मुख्य संपादक अमोल शिर्के यांनी नुकतेच संगमनेर येथे आपल्या नवीन कार्यालयाचा शुभारंभ केला. या निमित्ताने दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अमोल शिर्के यांचा घड्याळ, शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार केला.



यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अमोल शिर्के यांना नवीन कार्यालयाच्या शुभारंभाबद्दल शुभेच्छा देत पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक सदिच्छा व्यक्त केल्या. नवीन कार्यालयाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासोबतच सर्वसामान्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडल्या जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा झाली. अमोल शिर्के यांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांचे आभार मानत त्यांच्या शुभेच्छांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नवीन कार्यालयाच्या माध्यमातून पत्रकारितेच्या क्षेत्रात अधिक व्यापक आणि प्रभावी काम करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

## सीताराम सारडा विद्यालयात राखी बनवा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### रक्षाबंधन केवळ सण नसून संस्कृतीचा उत्सव : ॲड.अनंत फडणीस

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

रक्षाबंधन हा केवळ सण नाही, तर भारतीय संस्कृतीतील बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा उत्सव आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बनविलेल्या राखीतून सर्जनशीलता आणि आपुलकी दिसून येते. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे संस्कार रुजतात, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस यांनी केले.

बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात रक्षाबंधनानिमित्त राखी बनवा कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून सुबक,आकर्षक व कलात्मक राख्या बनविल्या.यावेळी कार्यक्रमा प्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ड.अनंत फडणीस,कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ.पारस कोठारी,प्रमुख पाहुणे उद्योजक मोहन मानधना,चेअरमन अजित बोरा,मुख्याध्यापिका सौ.मंगला




डोळस,पर्यवेक्षिका सौ.नंदा कानिटकर, शिक्षक प्रतिनिधी विनोद जोशी, सौ.निमा राहिंज, समिती प्रमुख सौ. शितल शिंदे,गणेश नागपुरे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवकवृंद उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल -प्रथम क्रमांक -कु. रामकुमारी बनारसी (९ वी),द्वितीय क्रमांक - कु. ज्ञानेश्वरी बेरड (८ वी)तृतीय क्रमांक - कु. लोकेश्वरी परदेशी (७ वी)उत्तेजनार्थ -कु.हर्षाली जाटव,रिबेका कांबळे,संजना उमाप विजेते. विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थिनींना रोख बक्षीस व उत्तेजनार्थ बक्षीस पात्र विद्यार्थिनींना भेटवस्तू दिल्या.

# अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणूक: १० वर्षांची अट रद्द, रिंगणाबाहेर गेलेले पुन्हा रिंगणात येणार

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली असली तरी तसेच अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतरही सहकार संस्था निवडणूक नियमातील तरतूदीनुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी पाच दिवस आधी नव्याने ठराव करण्याची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे १० वर्षांची मर्यादा राज्य शासनाने मागे घेतल्याने, ठराव नसल्याने रिंगणातून बाहेर पडलेल्यांना आता या नियमाच्या आधारे निवडणूक लढवण्याची संधी मिळू शकते.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मतदारांची प्रारूप यादी तयार करण्यासाठी सभासद संस्थांचे ठराव मागविण्याचे आदेश जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधकांनी काढले. त्यासोबत सहकारी संस्था निवडणूक नियमावली देण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी १७ जून ते २६ जुलैपर्यंत सदस्य संस्थांचे प्रतिनिधींचे ठराव देण्याची मुदत होती. त्यानुसार संस्थांनी सहकार विभागाकडे ठराव पाठविले.

त्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी १९ ऑगस्टला निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. दि. ३१ ऑगस्टपर्यंत हरकती व सुचना करण्याची मुदत देण्यात आली आहे.

अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल.

दरम्यान, निवडणुकीच्या प्रारूप यादीसाठी ३ हजार ६४७ संस्था प्रतिनिधीचे ठराव आले. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले. २३३ संस्थांनी ठराव सादर केले नाहीत. मतदार यादी प्रसिद्ध होईपर्यंत १० वर्षांचे बंधन कायम होते. त्यामुळे सहकारातील अनेक दिग्गजांचे ठराव त्यामुळे यादीत समाविष्ट होऊ शकलेले नव्हते. आता ३१ ऑगस्टपर्यंत प्रारूप मतदार यादीवर हरकती घेण्याची मुदत दिली असतांनाच राज्य शासनाने २२ ऑगस्टला विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर १० वर्षांच्या कार्यकाळानंतर निवडणूक लढवण्याची बंदी मागे घेतली.

सहकारी बँकांच्या संचालकांना १० वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला म्हणून निवडणूक लढविण्यास अपात्र ठरवू नये, या आदेशाने आता बँकेच्या ज्येष्ठ संचालकांना दिलास मिळाला आहे. मात्र पुर्वीच्या निर्बंधांमुळे अनेक ज्येष्ठ संचालकांनी निवडणुकीतून माघार घेतली होती. आता दहा वर्षानंतरही निवडणूक लढता येणार असल्याचा मार्ग मोकळा झाल्याने संचालकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यात आता सहकार संस्था निवडणूक नियमाचाही आधार मिळाला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ च्या नियम १० मधील पोटनियम ४ मधील तरतूदीनुसार सभासद संस्थेने एकदा पाठविलेला प्रतिनिधीचा ठराव जर संस्थेचे संचालक मंडळ निवडणुकीद्वारे बदलले असेल किंवा प्रतिनिधींचा मृत्यू झाला असेल किंवा प्रतिनिधीने राजीनामा दिला




असेल किंवा अधिनियमाच्या, नियमाच्या, उपविधीच्या कोणत्याही तरतूदी अन्वये सक्षम प्राधिकरणाच्या अभिनिर्णयानुसार असा प्रतिनिधी अपात्र असल्याचे आढळून आले असेल, अशा चार कारणांसाठी नव्याने ठराव घेउन प्रतिनिधी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या ५ दिवस आधी बदलला येऊ शकेल अन्यथा बदल करता येणार नाही.

या पोटनियमामुळे आता संचालकांना पुन्हा ठराव करण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे रिंगणाबाहेर गेलेले पुन्हा निवडणूक रिंगणात उतरू शकणार आहेत.